
# शिवपुत्र संभाजीराजे

तीन अंकी नाट्य



लेखक :

**मनोज शेडगे**

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# शिवपुत्र संभाजीराजे

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

तीन अंकी नाट्य

# शिवपुत्र संभाजीराजे

लेखक : श्री. मनोज सखाराम शेडगे

# शिवपुत्र संभाजीराजे


## लेखक : श्री. मनोज सखाराम शेडगे

पत्ता : २६७ / ३६ दुर्वांकुर, जानकीनगर, उंचगाव,

कोल्हापूर ता: करवीर जि : कोल्हापूर

मूळ गाव : शिवापूर [कुडाळ जि : सिंधुदुर्ग]

८४२१०३८५११ / ७५८८१४४२३२

Email: svm.manojshedge@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

whatsapp- 9987737237

प्रकाशन : २५ नोव्हेंबर २०२१

कार्तिक वद्य षष्ठी गुरुपुष्यामृतयोग शके १९४३.

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

## श्री. मनोज सखाराम शेडगे



एम.ए.बीएड.

समर्थ विद्या मंदिर व समर्थ विद्यालय कोल्हापूर येथे कार्यरत

उपक्रमशील विद्यार्थीप्रिय शिक्षक

‘मनात’ कविता संग्रहाचे लेखन

‘शिवपुत्र संभाजीराजे’ नाटक लेखन व दिग्दर्शक

‘जिद्द’ या नवीन पुस्तकाचे लेखन चालू आहे.

ऐतिहासिक पुस्तकांचे वाचन करायला आवडते. नाटके पाहणे छंद असून गायन, हार्मोनियम वर नवनवीन अभंग गवळणी वाजविणे शिकणे खूप आवडते. कोरोना काळात विविध संतांचे जवळपास १०० अभंग, ३५ गवळणी, १५ भारुड संकलित करून हार्मोनियम वर विविध रागात वाजवण्याचा सराव केला. हिंदी जुनी गाणी म्हणणे,नाट्य संगीत खूप आवडते. कविता करणे व वाचन करणे असे छंद आहेत. आज पर्यत जवळपास ८० कविता लिहिल्या आहेत. विश्वास पाटील – संभाजी , शिवाजी सावंत,

रणजीत देसाई – श्रीमान योगी, बाबासाहेब पुरंदर – राजा शिवछत्रपती , पु.ल. देशपांडे - , यांची पुस्तके विशेष आवडतात. तसेच आजपर्यंत मी जवळपास ५०० हून अधिक पुस्तके स्वतः खरेदी करून घरी छोटीसे वाचनालय सुरु केले आहे. त्याचबरोबर माझ्या शाळेतील अच्युत गोडबोले यांचे ‘मनात’,यांनी घडवले सहस्त्रक, विनायक डंके – ‘नेपोलियन दि ग्रेट’, आचार्य अत्रे – मी कसा झालो अशा अनेक पुस्तकांचे मी वाचन करत आहे.

पत्ता : २६७ / ३६ दुर्वांकुर जानकीनगर उंचगाव

कोल्हापूर ता: करवीर जि : कोल्हापूर

मूळ गाव : शिवापूर [कुडाळ जि : सिंधुदुर्ग]

८४२१०३८५११ / ७५८८१४४२३२

Email: svm.manojshedge@gmail.co.

# अर्पणपत्रिका

अतिशय दुर्गम एका छोट्याशा खेडेगावात जन्म झाला. दीड वर्षाचा असताना पोलिओमुळे डावा पाय कमकुवत झाला; पण माझी अशिक्षित आई माझा पाय झाली. तीनं मला जीवनात खडतर प्रवास सहज करायला शिकवलं.

भारतीय सैन्यात नोकरी करणारा माझा बाप.

पोर बरा व्हावा.. चालावा... या वेड्या आशेने डॉक्टरांकडे वनवन उपचारासाठी फिरणाऱ्या माझ्या आई बापास हे पुस्तक अर्पण ...



# दोन शब्द

“शिवपुत्र संभाजीराजे” हे माझं पहिलं नाट्यपुष्प आपल्या सारख्या इतिहास प्रेमी रसिकांच्या समोर ठेवताना मला अत्यंत आनंद होत आहे. या नाट्य प्रयोगात स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी राजे यांचा महापराक्रम आपणास दिसेल.

शिवरायांच्या मृत्यूनंतर सारा हिंदुस्तान जिंकण्याच्या आशेने दक्षिणेत पाच लाख सैन्य घेऊन स्वराज्यावर चालून आलेल्या औरंगजेबास ९ वर्षे झुलवत ठेवणारा तुम्हाला संभाजी दिसेल. छत्रपतींच्या निधनानंतर सारा महाराष्ट्र अधिकच पेटून उठला. सह्याद्रीच्या कडेकपारी घोड्यांच्या टापांनी घुमू लागला..रक्ताची मानस, आप्त स्वकीय स्वत:च्या स्वार्थासाठी अन् क्षणिक सुखासाठी दूर गेली. फंदफितुरांनी डाव साधला. पण शिवपुत्र संभाजीराजे साऱ्यांना पुरून उरला. हे वाचल्यावर तुमचे अंग रोमांचित झाल्यावाचून राहणार नाही.

“शिवपुत्र संभाजीराजे” या तीन अंकी नाट्य प्रयोगातून आपल्याला संभाजी महाराजांचा धगधगता इतिहास आपल्या या नाट्यप्रयोगातून अनुभवता येईल यात काही शंका नाही.

माझी इच्छा आहे, की “शिवपुत्र संभाजीराजे” हे नाटक व्यावसायिक रंगमंचावर यावं; आणि साऱ्या जगाला कळावं माझा

राजा काय होता, प्रजेचा बाप होता, धर्मवीर योध्दा होता, हिंदवी स्वराज्याचा रक्षक होता.

बालपणापासून मनात खूप इच्छा होती की माझ्या गावात होणारी शिवजयंती / शिव महोत्सवात सादरीकरण होणारी छत्रपतींच्या जीवनातील अनेक पराक्रमाची नाटके पाहून आपणही एखाद्या मावळ्याची भूमिका कारवी; पण दिव्यांग असल्याने जमलं नाही. पण हे नाटक आपल्या हाती देऊन तिही इच्छा पूर्ण झाल्याचा स्वर्ग अनुभव मी अनुभवत आहे.

इसाहित्यचे वाचक हे पुस्तक वाचतील आणि अभिप्राय देतील अशी आशा वाटते.

धन्यवाद !

लेखक : मनोज शेडगे

८४२१०३८५११

मूळ गाव : शिवापूर [कुडाळ जि : सिंधुदुर्ग]

Email: svm.manojshedge@gmail.co.

समर्थ विदयालय कोल्हापूर येथे कार्यरत

उपक्रमशील विद्यार्थीप्रिय शिक्षक

‘मनात’ कविता संग्रहाचे लेखन

‘शिवपुत्र संभाजी’ नाटक लेखन व दिग्दर्शक

# प्रास्ताविक

कित्येक दिवस मनाला खंत वाटत होती. मी चौथी इयत्तेत माझ्या जन्मगावी शिवापूर, तालुका कुडाळ सिंधुदुर्ग येथे शिकत होतो. माझा मोठा भाऊ संभाजी हा सातवीमध्ये शिवापूरच्या प्राथमिक शाळेत शिकत असताना "राजा संभाजी" हे नाटक त्या वर्गाने वार्षिक स्नेह्संमेलनाला सादर केले होते. साधारण १९८१ सालची गोष्ट असावी. माझ्या भावाने तेव्हा गणोजी शिर्के, शिवाजी रेंबाळकर यांनी संभाजी, मारुती गुंजाळ (गुरुजी) यांनी खंडोजी, कवी कलश गुणाजी गुंजाळ आणि औरंगजेब चंद्रकांत राऊळ यांनी भूमिका केल्या होत्या. त्या नाट्य प्रयोगात संभाजी राजे व्यसनी दाखवले गेले. मी साधारण तिसरी – चौथीत शिकत असेन. तेव्हा १० वर्षाचा असलो, तरी रक्त मराठ्याच गाडकऱ्याचं असल्याने संभाजी राजांच्या दाखवलेल्या व्यसनी भूमिकेने मी तेव्हा त्या बाल वयातही फार दु:खी झालो होतो. माझ्या छत्रपतीचा छावा असा नसावा आणि नसणार याची मला मनोमन खात्री होती. तो असणार महायोद्धा, रणवीर, वाघाच्या जबड्यात हात घालणार; पण का कुणास ठावूक कोणत्या लेखकाने हे चुकीचं मांडलं आणि का? हा प्रश्न मला कित्येक वर्षे सतावत हृदयात सलत होता. तेव्हाच मी ठरवलं होतं; की खरं काय, ते आपण जगासमोर मांडायचं. काही

का असेना आज ना उद्या सत्य जगासमोर आणायचं. माझ्या शिवपुत्र संभाजीराजेची झाली बदनामी तेवढी बसं! आता नाही सहन होणार; असं ठरवून अनेक इतिहासकारांनी लिहिलेल्या पुस्तकांचा व्यवस्थितपणे अभ्यास सुरु केला. खास करून विश्वास पाटील यांच्या 'संभाजी' या कादंबरीचा आणि माझ्या जीवनातील पहिलं वहिलं "शिवपुत्र संभाजीराजे" हे तीन अंकी नाटक मी रसिकांच्या नाट्यमंदिरात मराठी मनाने सुपूर्त करत आहे.

आज १९ फेब्रु.२०१७ रोजी 'शिवजयंतीच्या शुभ मुहूर्तावर' हे नाटक रसिकांच्या स्वाधीन करताना मला खूप आनंद होतो आहे, पण माझं हृदयही भरून येत आहे. मी १० वर्षाचा असल्यापासून आज ४५ वर्षाचा झालो; तरी गेली ३५ वर्षे माझ्या हृदयात सलणारी शोकाग्नी मी आज शांत करू शकलो, याचं मला समाधान मनोमनी वाटतं. मी या कामाला सुरुवात केली आणि माझा अपघात झाला. माझा डावा हात पूर्ण निकामी झाला असताना मी हे लिहिण्याच पवित्र काम करत होतो. जवळ जवळ ४ महिने त्या हाताने काहीच काम करता येईना, कच्च्या नोट्स तयार होत्या पण टायपिंगचं काय? माझं मन मला स्वस्थ बसू देत नव्हतं; अन मग ठरवलं अरे! आपल्या संभाजी राजानं त्या औरंग्याच्या पाच लाख सेनासागर फौजेला नऊ वर्षे झुलवत ठेवून तुंबा दिला. अन तीही कमी साधनं, प्रतिकूल परिस्थिती, निसर्गाचा

कोप एवढं सगळं असताना; बारा आघाड्या एकाच वेळी सांभाळणाऱ्या शिवपुत्रासाठी तू हे करू शकत नाहीस, असं एक मन मला सांगत होत. माझं मन मला सतावत होतं. छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या शिवापूर गावाचा गडकरी रहिवाशी आहेस तू, अरे! शापित राजहंसाचे खरे चरित्र आण जगासमो, चल उठ हात घाल गळयात अन बसं लिहायला. माझ्या हाताच्या वेदना दु:ख मी विसरलो आणि जोमाने कामाला लागलो. ही स्फुर्ती होती संभाजी राजांच्या बलिदानाची, गडकरी बाण्याची आणि माझ्या शिवरायांची. म्हणूनच मी हे नाट्य पुष्प पूर्ण करू शकलो.

आजही मी सुट्टी निमित्त कोकणात शिवापूरला जातो; तेव्हा माझ्या घराच्या अंगणातून दिसणाऱ्या गावातील "मनोहर मन – संतोष" गडाकडे एकटक पाहत बसतो. पावसाळयातील दिवसात धुक्यात हरवलेल्या "मनोहर मन संतोष" आणि दूर दिसणारा "रांगणं" शोधणे कधी कधी नित्याचेच होऊन जाते.

हे नाटक लिहिण्याचा प्रामाणिक हेतू असा की, माझ्या राजांचा चुकीचा इतिहास काही लेखकांनी नाटकातून जगासमोर आणला होता. तो दूर करणे आणि सत्य काय आहे, हे या महाराष्ट्राच्या जनते समोर आणणे एवढचं. जर संभाजी राजे व्यसनी

असते; तर औरंगजेबाच्या पाच लाख सैन्याशी सतत आठ वर्षे एवढ्या कमी साधनाने लढू शकले नसते. मी सर्वांना या नाट्य रूपाने सांगू इच्छितो, की इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेच, डच, मुघल अशा बलाढ्य शत्रूशी एकाच वेळी लढणं आणि फितुरीच्या शापानं भयभीत झालेल्या साऱ्या महाराष्ट्राला एकत्र करून लढवत ठेवणं ही सोपी गोष्ट नाही. आशिया खंडातील सर्वात मोठी राजसत्ता ही औरंगजेबाची होती, तर सर्वात लहान राजसत्ता होती माझ्या शंभूची. जर आपला शंभूराजा व्यसनी असता, तर हे शक्य होतं का? असा प्रश्न स्वतःच स्वतःला केलेला बरा. माझ्या राजाला सुपारीच्या खंडाचही व्यसन नव्हतं. ज्यांनी हे नाटकातून दाखवलं त्यांनी नाटक लिहितांना स्वत: घेतली होती का? असा प्रश्न मात्र इतिहास अभ्यासकाला पडतो हे मात्र खरं !

दुसरं संभाजी राज्यांना बायकांचा नाद होता. असं काही लोकांकडून खोटं उठवलं गेले. साधी गोष्ट आहे, असं असतं तर त्यांनी दोनच लग्न का केली? त्यावेळी जास्त लग्न करणं समाज मान्य होत. त्यावेळचे राजे बरीच लग्ने करायचे, पण संभाजीराज्यांनी नाही केलं. आपल्यापेक्षा वयानी लहान असणाऱ्या राजाराम महाराज्यांची तीन लग्न संभाजी राजांनी स्वत: लाऊन दिली. ज्या थोरातांच्या कमळाने संभाजी राजांमुळे आत्महत्या केली, असे सांगितले जाते. ती मुलगी पुढे ९ वर्षे जिवंत

होती. कारण तिच्या मृत्यूचे साल आहे १६९८ व संभाजी राजे यांच्या मृत्यूचे साल आहे १६८९. महाराजांचे कारभारी अण्णाजी दत्तो यांच्या मेहुनीची मुलगी गोदाबाई हिने आपले सासरे त्र्यंबकराव व पती निवासराव यांनी रंगपंचमीच्या दिवशी राजांना जीवे मारण्याचा कट रचला होता. ते कपट कारस्थान गोदाबाईने संभाजी राजांना येऊन सांगितले व शिवाजी राजांचा व संभाजी राजांचे प्राण वाचवले. आता हा संभाजी आपल्याला जिवंत ठेवणार नाही. म्हणून संभाजीने माझ्या रत्ना सारख्या सुनेला पळवून नेलं असा; त्र्यंबकराव व पती निवासराव यांनी या कपट कारस्थानातून स्वत:ला वाचण्यासाठी उगाचच कांगावा केला. आणि गोदुला सुरक्षीत ठेवण्यासाठी संभाजी राजांच्या धर्म पत्नीने म्हणजे येसुबाईनेचं पुढाकार घेतला होता. नाहीतर हे दोघे गोदाबाईला ठार मारणार होते. आता असा पण प्रश्न निर्माण होतो. की आपल्याच घरची चाडी ती कशी करेल, पण एवढ लक्षात असू द्या शिवाजी राजांचे हिंदवी स्वराज्य हे कोण्या एकाचे नव्हते, तर ते रयतेचे होते. शिवाजी राजांवर रयतेची अपार श्रद्धा होती. ते रयतेचे राजे होते. शिवाय संभाजी राजे तिला मनापासून आवडत होते. त्यात संभाजी राजांचा काहीचं दोष नाही. पण काही लोकांनी अतिरंजित करून खोटा इतिहास जगासमोर स्वतःच्या स्वार्थासाठी मांडला. आणखी एक राजे फितूर झाले; दिल्लेर खानाला मिळाले, ही चाल स्वतः

छत्रपती शिवाजी महाराजांचीच होती. कारण राजे त्यावेळी कर्नाटकयुद्धातून आले होते. स्वराज्य सुरक्षीत राहावे म्हणून खानाला झुलवत ठेवण्याशिवाय पर्याय नव्हता. शिवाय सैन्य दमले होते. शस्त्र मोडली होती. अशा परिस्थितीत दिलेरखानावर आक्रमण करणे शक्य नव्हते. अशी अनेक कारणे आहेत. आतातरी आपण सुज्ञ लोकांनी हे जाणलं पाहिजे. आणि आपल्या राजाचा खरा इतिहास लोकांसमोर आणला पाहिजे. तरचं आपण डोक्याला भगवा टीळा लाऊन फिरायच्या लायकीचे आहोत असे मला वाटते. या नाटकातून मानवी भाव - भावनांचा विचार केला गेला असून. राजा असला तरी तो एक माणूस आसतो. हे लक्षात घेऊन मानसिकता, वेळ, प्रसंग यांची जुळवा जुळव केलेली आहे. हे लक्षात घेणे जरुरीचे आहे.

थोडक्यात संभाजीराजांची कमी वयात, कमी वेळात, कमी साधनात फार मोठी कामगिरी या नाटकातून मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या नाट्यप्रयोगात बऱ्याचं व्यक्तिरेखा आहेत. नाट्यप्रयोग डोळ्यासमोर ठेऊन काही व्यक्तिरेखा कमी केल्या आहेत. प्रयोगाच्या दृष्टीने महत्त्वाच्याच व्यक्तिरेखांचा समावेश करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे.  हे नाटक लिहित असताना मी आजारी असल्याने बऱ्याच अडचणी आल्या त्या दूर करण्यासाठी माझी पत्नी सौ.मानसीने जबाबदारीची नोकरी व घर

सांभाळून उत्तम सहकार्य केले. शिवाय आमच्या समर्थ विद्या मंदिरच्या ग्रंथपाल व ई साहित्य प्रतिष्ठानच्या कानगोष्टी विभाग प्रमुख कु. अंजना लगस हिने नाटक वाचून ते प्रकाशित करण्यासाठी मला सहकार्य केले.


आमच्या संस्थेच्या उपाध्यक्षा आणि सुप्रसिद्ध गायिका कै. रजनीताई करकरे – देशपांडे, सुचित्रा ताई मोर्डेकर यांनीही वाचून अभिप्राय दिला आणि प्रोत्साहन दिले. आज ई साहित्य प्रतिष्ठान मुंबईचे अध्यक्ष मा. सुनीळ सामंत सर यांनी त्वरित माझ्या पुस्तक प्रकाशनास अनुमती दिली. त्यामुळेच हे पुस्तक प्रकाशित होत आहे याचा मला अभिमान वाटतो. ई साहित्य टीम व सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

"शिवपुत्र संभाजी" हे नाटक शिवप्रेमी घराघरातून वाचले जावे. त्याचे गावोगावी भव्य प्रयोग सादर व्हावेत आणि नव्या पिढीला त्यांचे खरे शंभूराजे कळावेत. हेच कळकळीचे गाऱ्हाणे भवानीमातेला!

धन्यवाद!

आपला विश्वासू

श्री. मनोज सखाराम शेडगे


शिवपुत्र
संभाजीराजे
लेखक व दिग्दर्शक : श्री.मनोज शेडगे [सर]
५/१/२०१७

# पात्र-योजना

**मराठे सरदार**

१. संभाजी राजे
२. शिवाजी राजे
३. राणी येसूबाई
४. हंबीरराव मोहिते
५. कवि कलश
६. म्हाळोजी घोरपडे
७. अण्णाजी दत्तो
८. मोरोपंत
९. कोंडाजी फर्जंत
१०. येसाजी कंक
११. गणोजी शिर्के
१२. नरोजी भोसले
१३. जानू
१४. खंडो बल्लाळ
१५. संताजी घोरपडे
१६. धनाजी जाधव
१७. राणू आक्का, दुर्गा, कमळजा, पिऱ्या, बिरज्या, इल्या, झोऱ्या, शिपाई.

**मुघल सरदार**

१. औरंगजेब
२. शहाबुद्धीन खान
३. बहादूर खान
४. असद खान
५. फते खान
६. सर्जा खान
७. मुखर्ब खान
८. इखलास खान
९. फौलाद खान
१०. रुहुल्ला खान
११. मियां खान
१२. हसनअली खान
१३. शिपाई

# अंक १

*एकाच वेळी मुघल, इंग्रज, डच, पोर्तुगीज, निजाम अशा बलाढ्य शत्रूंशी सतत ९ वर्ष १४० लढाया लढत राहणारा व एकदाही न हरणारा मराठशाहीचा 'राजा छत्रपती संभाजी' फंद फितुरीने तळकोकणात नावडी नदी काठी मुरब्ब खानाकडून पकडले जातात. तो खराखुरा इतिहास घेऊन येत आहेत. शिवापूर नाट्य निकेतन मंडळ, [शिवापूर] ता : कुडाळ जि : सिधुदुर्ग ....*

[पन्हाळ गडाचा दरबार संभाजी राजे बसलेले असतात आणि हंबीरराव मोहिते प्रवेश मुजरा करतात.]

संभाजी राजे : "मामासाहेब, आबासाहेब गेले..हे हिंदवी स्वराज पुढे जोमाने वाढवण्याची जबाबदारी आमच्यावर टाकून".

हंबीरराव : "होय, राजे या महाराष्ट्राची जबाबदारी आता आपल्याच खांद्यावर आहे."

संभाजी राजे : आपल्यासारखे स्वराज्याचे शिपाई आम्हाला मिळाले तर; आम्ही आमच्या कामात तसूभरही कमी पडणार नाही.

हंबीरराव : “शंभूराजे, हे राज्य निर्माण करतेवेळी शिवरायांनी ह्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील एकेक मावळा एकत्र आणला. स्वराज्याची वज्र मुठ बांधली अन हे स्वराज्य निर्माण केले. आज आपल्यालाही हा सह्याद्री खुणावतो आहे साद घालतो आहे. इथल्या रयतेला शभूराज्यांचेच राज्य हवे! तेव्हा आपण.”......

संभाजी राजे : “मामासाहेब, आबासाहेबांना अनेक आघाड्यात आम्ही साथ दिली. आमच्यावर विश्वासही होता त्यांचा; हे हिंदवी स्वराज्य हा शंभूराजाच वाढवेल सांभाळेल.”...

हंबीरराव : “होय राजे, आपल्या पराक्रमावर शिवाजी महाराज्यांचा फार विश्वास होता.” आता राजे नसले तरी, आपण हे राज्य संभाळाल यात त्यांना कोणतीच शंका नव्हती. “शिवाजीराजे एकदा बोलता बोलता आम्हांस म्हणाले होते”. “माझा शंभू बाळ, हे स्वराज्य खूप मोठ करेल; रयतेचा राजा म्हणून नाव करेल”. त्यावर मी राज्यांना विश्वास दिला; राजं आपला शंभू खरा वारसदार!

अन रयतेला हवा हवासा वाटणारा राजा हाय. त्यावर राज हसलं अन म्हणालं बसं या पलीकड आम्हांस काही नको.” .

संभाजी राजे : “मामासाहेब, आपण या स्वराज्याचे सर सेनापती- आज आपल्या स्वराज्यावर एकाच वेळी अनेक शत्रू आक्रमण करण्याच्या तयारीत आहेत. उत्तरे कडून तो काळसर्प औरंगजेब पाच लाखाची फौज घेऊन दक्षिणेत उतरत आहे. गोव्यात पोर्तुगीज, दक्षिणेत आदिलशहा, निजाम, मुंबईत इंग्रज या सर्वांशी आपणास झुंज एकाच वेळी देणे शक्य नाही.”

हंबीरराव : “खरं आहे राज' आपल्याकड जेम तेम सत्तर हजाराची फौज आहे. या सर्वांशी झुंज द्यायची म्हटलं तर अजून आपल्याला फौज उभी करायला हवी. शिवाय खाजानही भरपूर हवा.”

*[बोलत असताना कवी कलश भेट घेणार आल्याची बातमी घेऊन शिपाई येतो. राजे कवींना बोलावतात. मुजरा करत प्रवेश करतात.]*

संभाजी राजे : “या कविराज बरं झालं! तुम्ही वेळेवर आलात, आम्हीं तुमचीच वाट पाहत होतो.”

कवी कलश : “बोला राजे! काय हुकुम आहे आपला.” [स्मितहास्य करत.]

संभाजी राजे : “कवी राज, एखाद्या अडचणीच्या वेळी कोणता निर्णय घ्यावा असे आपणास वाटते.”

कवी कलश : “राजे आपण समर धुरंधर, पंडित, ज्ञानी, थोर कायदे पंडित अशा आमच्या राज्याला आम्ही काय सल्ला देणार.”

संभाजी राजे : बरं, ते जाऊदे, मामासाहेब तो औरंगजेब स्वराज्यावर चालून येण्याआधी आपण दक्षिणेवर स्वारी करावी म्हणतो. तो काळसर्प स्वराज्यावर चालून येण्यास अजून पाच सहा महिने लागतील, तोपर्यंत आम्ही दक्षिण लुटू. स्वराज्याचे रक्षण करण्यास मोठा खजाना लागेल; त्याची जुळवा जुळव करू.”

कवी कलश : “वा! राजे वा! उत्तम, अगदी उत्तम. या सर्वांना अंगावर घ्यायचं तर खजाना लागणारच.”

संभाजी राजे : "आबा साहेबांनी निर्माण केलेलं हे करोडो होनांचं हिंदवी स्वराज्य, खजाना सांभाळण्यासाठी आपण सर्वांनी पुढं आलं पाहिजे."

हंबीरराव : "शंभू राजे, हे स्वराज्य निर्माण करण्यासाठी आम्ही रात्रीचा दिवस केला. ते सांभाळण्यासाठी आम्ही आमचे प्राण देऊ. पण हे स्वराज्य कोणाच्या घशात जाऊ देणार नाही. याची खात्री आम्ही आपणास देतो."

संभाजी राजे : "आम्हाला कल्पना आहे, त्याची मामासाहेब. तुमच्या सारख्या शूर मर्द- मराठ्याच्या खांद्यावरच हे स्वराज्य उभं आहे. आणि या पुढंही राहिलं."

कवी कलश : "राजे, आपल्या बरोबर स्वराज्यातील रयत आहे. मामासाहेबांन सारखे शूर सेनापती आहेत. अशा वेळी चिंता करण्याची काय गरज."

संभाजी राजे : "कवी राज, आम्ही आमची चिंता करत नाही. आम्हीं स्वराज्याची चिंता करत आहोत. स्वराज्यावर वाकडी नजर करू पाहणाऱ्याची मुंडी मारल्या शिवाय आम्ही राहणार नाही."

हंबीरराव : "शंभू राजे, दक्षिणेच्या मोहिमेसाठी आम्ही फौजेसहीत तयारी करतो. आपल्या हुकुमाची वाट पाहत आहोत."

संभाजी राजे : "मामासाहेब, तुम्ही निघा पंधरा हजाराची फौज तयार ठेवा तुमच्या बरोबर. काही कमीजास्त वाटल्यास तुरंत निरोप पाठवा आम्हांला." [एकमेकाला कडकडून भेटतात हंबीरराव मुजरा करून निघतात.]

संभाजी राजे : "कवी राज, आपण कोणती आघाडी सांभाळणार आहात."

कवी कलश : "राजन आम्हांला आपण कोणतीही आघाडी द्या. आमच्या जीवात जीव असे पर्यंत तुमच्या अन स्वराज्याच्या केसालाही धक्का लागू देणार नाही."

संभाजी राजे : "कविराज खरोखरचं तुम्ही आमचे दिलाचे सच्चे दोस्त आहात."

कवी कलश : "राजन, तुमच्यासारख्या सच्या दिलाच्या दोस्तासाठी आम्ही आमचा जीव ओवाळून टाकावासा वाटतो. ते भाग्य आम्हांस मिळाले; तर आम्ही ती संधी मुळीचं सोडणार नाही."

संभाजी राजे : "कविराज, उत्तरेकडून औरंग्याचा सेनासागर या महाराष्ट्राच्या मातीवर चालून येत आहे. त्या काळसर्पाला वेळीच ठेचल नाही, तर हिंदवी स्वराज्यावर संकटाचे पहाड कोसळतील. आपलं स्वराज्य म्हणजे

आपल्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील डोंगरी किल्ले त्याचं संरक्षण करण म्हणजे स्वराज्याचं रक्षण..”

कवी कलश : “होय, राजन आपले किल्ले म्हणजेच आपलं स्वराज्य! आपल्या सर्व किल्लेदारांना तशा सूचना आम्ही केव्हाच दिलेल्या आहेत.”

संभाजी राजे : “वा! कविराज, वा! आपण तर स्वराज्याचे आमचे शिलेदार आहात. एक सच्चा मित्र म्हणून आम्हांस खूप अभिमान वाटतो तुमचा.”

कवी कलश : “राजे, आता तारीफ करण्यात वेळ वाया नको. स्वराज्याचे रक्षणासाठी आपणास पुढील कामगिरीसाठी गेलं पाहिजे.”

संभाजी राजे : “होय, कविराज त्या औरंग्याला या मराठी मातीतच गाढू आणि मागचं शांत बसू. चालातर मग निघूच आपण.” .

*[संभाजीच्या मागून कवी कलश निघून जातात दुसऱ्या बाजूने आण्णाजी दत्तो आणि मोरोपंत, फिरोजी आपसात बोलत बोलत प्रवेश येतात.]*

आण्णाजी दत्तो : “राजे तर गेले, आमचं आता कसं होणार.. तो संभाजी गादिवर आला, तर आपले काही खरे नाही. राजे असतानाच आपल्याला तो जुमानत नव्हता. शूर आहे, बलाढ्य आहे, ज्ञन पंडित आहे, धर्म पंडित आहे. आमचं काहीच ऐकणार नाही. आमचा असूनही आता काहीच उपयोग नाही. मोरोपंत”.

मोरोपंत : “खरं आहे. आपलं म्हणण! पण करायचं तरी काय?”

कोंडाजी फर्जत : “होय, काहीही करून संभाजी गादिवर नको. तो आलाचं, तर आपला काहीच उपयोग नाही आणि काय खरही नाही.

मोरोपंत : “आपण असं करू. हंबीररावाना हाताशी धरून गादिवर राजाराम महाराजांना बसवू; ते वयाने लहान आहेत. त्यांना राज्यकारभार चालवता येणार नाही. आपणचं राज्यकारभार चालवू. आणि त्या संभाजीला अटकेत टाकू.”

आण्णाजी दत्तो : “पण, हंबीरराव तयार होतील काय?” याची खात्री कोणी द्यायची. नाहीतर आपल्यावरच डाव उलटायचा मग; आपल्याला टकमक टोकाशिवाय दुसरा रस्ता नाही; हे पण माहीत असुद्या. ‘मोरोपंत.”

मोरोपंत : “आण्णाजी, आतातरी आपलं काय होणार आहे. तो संभाजी गादीवर आला, तर आपलं राजकारण अन कारभार संपलाच की हो! म्हणून म्हणतो काय होतय ते होऊदे एकदाचं!”

आण्णाजी दत्तो : “आपण असं करू, हंबीररावाना खलिता पाठवून आपल्या कटात सामील करून घेऊ. राम राजांना गादी मिळाली, तर ते तयार होतील असे वाटते, पण थोरल्या राजांवर त्यांचा जीव आहे. शिवाय शिवाजी राजांन बरोबर एवढी वर्षे राज्य कारभार केलाय; तेव्हा गद्दारी करतील काय? अशी शंकाचं आहे.”

कोंडाजी फर्जत : पाठवून तरी बघू पत्र… एकदाचं! [हातात खलिता घेऊन लिहितात.]

*[खलिता पाठवले जाते. सर सेनापती हंबीर यासी, सा.दंडवत..राजे गेले फार वाईट झाले. राज्यकारभार चालवण्यासाठी “आपल्याच भाच्यांना, म्हणजे राजाराम महाराज यांना गादीवर बसवायचा आमचा पक्का इरादा आहे. ते तुमच्या सातकुलीचा उद्धार करतील. मात्र आमच्या या प्रयत्नांना आपला कौल मिळेल, तरच आम्ही यशस्वी होऊ.” आपण राज्य सांभाळावे आणि संभाजी राज्यांना कैद करावे.]*

आण्णाजी दत्तो : “कोण आहे रे तिकडे”....[शिपाई येतो शिपायाकडे खलिता पाठवला जाते.]

कोंडाजी फर्जत : “हंबीररावांचा निरोप येताच आपल्याला निघाले पाहिजे.”

आण्णाजी दत्तो : “होय, पाच हजाराची फौज तयार ठेवा. निरोप येताच आपण निघून संभाजीला कैद करू. आणि राजारामला गादीवर बसवू... [तेवढ्यात शिपाई येतो लखोटा देतो निघून जातो.] लखोटा वाचत आनंदी मुद्रेने इकडे तिकडे पाहत मोरोपंत आपलं काम झालं. चला फौज घ्या लागलीच सेनापतीना भेटू आणि त्या संभाजीला कैद करू”....

मोरोपंत : “चला ..चला..आता वेळ घालवायला नको चाला तर मग.”....

आण्णाजी दत्तो : “आता राज्य कारभार आपल्या हाती आलाच म्हणून समजा.”

मोरोपंत : “आता पाहू तो संभाजी कुठे पळतो!” [शिपाई येतो अण्णाजीकडे पाहून- “फौज तयार आहे.”]

आण्णाजी दत्तो : “चला.. चला..आता वेळ नको”... . [सर्वजण कैद हेतूने आनदाने जातात.]

*[कराड येथील हंबीररावांचा वाडा हंबीरराव बसलेले असतात. प्रधान प्रवेश करतात.]*

हंबीरराव : "या... प्रधानजी या !"

आण्णाजी दत्तो : [मृदुस्वरात] "छत्रपती गेले. मराठी राज्याचा आधार गेला. हंबीरराव, कस होणार मराठी रियासतीच; काहीच समजत नाही. थोरले महाराज आमचा अपमान करतात. राजे असतानाही आमचा मुलाहिजा राखायचे नाहीत. आतातर; ते आम्हाला ठेवणार नाहीत. आम्ही काय म्हणतो हंबीरराव; आपले भाचे राजाराम महाराजांना गादिवर बसवू व संभाजीराजांना कैद करू.''..

हंबीरराव : "का?" [रागाने]

आण्णाजी दत्तो : "संभाजी राजे मराठी सत्ता काळजीने सांभाळतील असे आम्हास वाटत नाही."

हंबीरराव : "प्रधानजी, ज्यांनी हे हिंदवी स्वराज्य निर्माण केलं. ज्यांनी मराठी माणसाची मान उंचावली, अनेक शत्रूंशी एकाच वेळी सामना केला. स्वता:च्या स्वार्थाचा कधी विचारच केला नाही. ते जाऊन अकरा दिवसही झाले

नाहीत आणि त्यांच्या पोराला कैद करायला निघाला. या पेक्षा दुर्दैव ते कोणते.”

मोरोपंत : “तसं, नाही हंबीरराव. [थोडं घाबरून दचकत.]

हंबीरराव : [करारी आवाजात.] “मग कस, तुमची चाल माझ्या केव्हाच लक्षात आली आहे, प्रधानजी.!.. राजाराम महाराज आमचे भाचे असले, तरी ते अजून अल्प वयीन आहेत. संभाजी राज्यांनी शिवाजी राजांबरोबर बऱ्याच आघाड्या सांभाळलेल्या आहेत. राजे असतानाही त्यांनी आपली कामगिरी सिद्ध केली आहे. हे आपणाला माहीत असतानाही...ही कुट नित कशासाठी आण्णाजी?”.

आण्णाजी दत्तो :[सर्वजण अतिशय घाबरलेल्या अवस्थेत.] “आपण गैरसमज करून घेता हंबीरराव”...

हंबीरराव : [हसत ..हसत..] “गैरसमज? आणि आम्ही ! प्रधानजी, आम्ही सेनापती आहोत. शिवाजी महाराज्यांच्या खांद्याला खांदा लाऊन या स्वराज्यासाठी तापून सुलाखून निघालेला सेनापती. आज पर्यंत आम्ही कधीच स्वता:चा विचार केला नाही. ही मराठशाही आपली सर्वांची आहे. हे हिंदवी स्वराज्य राजांनी आमच्या सारख्या अनेक शिपायांना एकत्र करून निर्माण केले ते कशासाठी.?”..

अण्णाजी दत्तो : “आम्ही तोच विचार करतो आहोत, हंबीरराव.”

हंबीरराव : “बसं, आम्ही तुमचं यापुढे काहीच ऐकू शकत नाही. आपण कशावरून मोघलाना सामील होणार नाही. आमचा तुमच्यावर आता अजिबात विश्वास राहिलेला नाही. कोण आहे रे... तिकडे ! कैद करा ही हराम जादा मानस.” [शिपाई हातात तलवारी घेउन धावत येतात.]

अण्णाजी दत्तो : “माफ करा, हंबीरराव आम्हांस माफ करा.. आमच्या कडून यापुढे असे होणार नाही. [सर्व जन भीतीने थर थर कापतात हंबीरराव शिपायांना बोलावतात आणि सर्वांना कैद करतात. सर्वजण सेनापतींचे पाय धरतात गयावया करतात.]

हंबीरराव : [हंबीरराव रागाने लाल बुंद नजरे पाहत.] “यांना पन्हाळ गडावर राजांसमोर हजर करा.”.[सर्वांना घेऊन जातात.] स्वता:च्या स्वार्थासाठी स्वराज्य विकण्यास निघणाऱ्या नालायक कारभाऱ्याच करायचं तरी काय? पन्हाळ गडावर जाऊन राज्याची भेट घोतली पाहिजे. नाहीतर स्वराज्याचा घात होईल.” [रागा रागाने ताडकन निघून जातात.]

** पडदा **

*[पन्हाळ गडाचा दरबार राजासमोर हंबीरराव सर्व कैदी हजर करतात. सर्वजण मना खाली घालून उभे असतात.]*

हंबीरराव:"राजे, ही घ्या नालायक हराम जादी मानस"..

संभाजी राजे : [उठून उभे राहतात शांतपणे सर्वांकडे पाहत.] "आबा साहेब जाऊन अजून त्याचं कार्यही झालं नाहीत. तोवर; परकीयांशी दोन हात करायचे की स्वकीयांशी?" मामासाहेब किती दुर्दैव आमच्या वाट्याला आलं!"....

हंबीरराव : "राज, असं हतबल होऊन चालणार नाही. तुमच्या पाठीशी हे हंबीरराव पहाडासारखे उभे आहेत. येणाऱ्या संकटाना चिरडून टाकण्यासाठी या सह्याद्रीच्या कडेकपारीतून लाखो मावळा या मराठशाहीसाठी धावून आपल्या पाठीशी उभा राहील. याची आम्हांस खात्री आहे. "शंभूराजे, आपल्यासारखा रयतेवर प्रेम करणारा राजा दुसरा कोणी नाही."

संभाजी राजे : "मामासाहेब, तुमच्या सारख्या एकनिष्ठ शिपायांच्या खांद्यावरच ही मराठशाही उभी आहे. या हराम खोरांची चाल मला माहीतच होती. आपण योग्यवेळी त्यांना ठेचलात ते योग्य केलात. आम्हांस यांच्याशी बोलण्याची

अगर त्यांची तोंडं पाहाण्याचीही अजिबात इच्छा नाही. स्वत:च्या स्वर्थासाठी एक चूक कितीवेळ करायची याला, पण मानमर्यादा असतात. घेऊन जा यांना.” [रागाने बोलतात. शिपाई घेऊन जातात.].

हंबीरराव : “शंभू राजे, आमच्या जीवात जीव असेपर्यंत स्वराज्याचे पाईक राहू.”

संभाजी राजे : “आम्हाला अभिमान वाटतो आपला मामासाहेब, आपले सख्खे भाजे राजाराम असतानाही तुम्ही आम्हांला या संकटाच्या काळात साथ दिलीत त्याचा!” [जवळ जाऊन.]

हंबीरराव : “राजे, आम्ही स्वराज्याचे पाईक आहोत. आजपर्यंत आम्ही कधीही स्वार्थाला शिवलो नाही आणि शिवानारही नाही. ही शिकवण शिवाजी राजांचीच आहे.”

संभाजी राजे : “ते आम्हांस माहीत आहे मामासाहेब. पण माणसाचा खर शत्रू हा स्वार्थाच आहे.”

हंबीरराव : “होय, राजे, पण आम्ही त्यापासून खूप दूर आहोत. राजे, स्वराज्यावर आलेल्या संकटाचा आपल्याला विचार करायचा आहे.” [विषय बदलत.]

संभाजी राजे : “मामासाहेब, स्वराज्याचा घाट बांधावा म्हणतो. पण; त्या औरंग्याचाही थाट उतरवला पाहिजे. जागा शोधा मोक्याची!”...

हंबीरराव : “राज, एक जागा हाय, औरंगजेबाचे आवडत ठिकाण दक्षिणेतील राजधानी बुऱ्हानपूरा अन औरंगाबाद.”

संभाजी राजे : “मग, टाका छापा त्या बुऱ्हानपूरावर. करा कोळसा बुऱ्हानपूराचा... औरंगबादाला पण सोडू नका. लुटा या दोन्ही मोगलांच्या ठिकाणांना. कळूदे त्या औरंग्याला या पुऱ्या हिंदुस्थानात औरंगजेबाशी झुंज घेईल तो एकच राजा आहे तो सर्जासंभाजी!”...

हंबीरराव : “राज, आज पर्यंत कोणी धाडस केलं नाही एवढ; तो काळ सर्प चवताळून चालून येईल दक्षिणेत. अनेक सरदार सोडेल तो आपल्यावर.”.

संभाजी राजे : “मामासाहेब, शिव छत्रपतींचे पुत्र आम्ही; तुमच्या सारखे मराठे सरदार आमच्या बरोबर असतील तर; असे हजारो औरंगजेब घेऊ आमच्या अंगावर आणि जिरवू त्या औरंग्याची मस्ती.”.

हंबीरराव : “पण राजे ”..

संभाजी राजे : “चला मामा साहेब स्वराज्यावर वाकड्या नजरेने पाहणाऱ्या या पातशाला संभाजीचा दणका काय हे कळलेच पाहिजे.” [संभाजी निघतात बरोणार हंबीरराव निघतात.]

*[जंगली रस्ता बहादूर खान,फते खान, शहाबुद्दीन खान चर्चा करत येतात.]*

शहाबुद्दीन खान : संभाजी...संभाजी...संभाजी..कहा है ये हैवान...उन्हे तो नीद हराम कर दी हमारी.”.

फते खान : “हम जल्दीही उन्हे गिरफदार करेंगे और शहनशहाके सामने पेश करेंगे”...

बहादूर खान : “संभाजी को पकडणा इतना सिदा काम नही, फते खान वो तो भूत है भूत..कब आता है और हमाला करता है मालूम भी नाही पडता.”..

*[हर हर महादेव..शिवाजी महाराज की जय. संभाजी महाराज की जय ...अशी गर्जना होतात. हंबीर राव, ज्योत्याजी केसकर, म्हाळोजी घोरपडे अचानक हल्ला करतात लढाई होते. थरथर कापत तिघेही पळून जातात]*

हंबीरराव : “आज वाचलात पण, उद्या आमच्याशीच गाठ आहे. शिवछत्रपतींच्या स्वराज्याकडे वाकड्या नजरेने

पाहणाऱ्याची खांडोळी केल्याशियाय आम्ही कधीही स्वस्थ बसणार नाही.”

म्हाळोजी : “या यवनांची लांडगे तोड केल्याशिवाय रयत सुखी होणार नाही. यांना मिळतील तिथेच कापून काढले पाहिजेत.”..[चला हर.हर महादेव...निघून जातात]

*[औरंगजेबाचा दरबार नमाज पडत असतो तेवढ्यात असद खान प्रवेश करतो.]*

असद खान : “हुजूर! .. बहादूर खान, फते खान, शहाबुद्दीन खान इनको संभाजीने शिकस्त कर दि है। वो तीन्होने संभा के सामने हार खाई है.”

औरंगजेब :[हळूच उठतो] “क्या बक्ते हो, इतना खजाना, इतने सरदार, इतनी तोफे देकर भी?”

असद खान : “हा, हुजूर.”.

औरंगजेब : “तो क्या करते है ये लोग” ....

असद खान : “हुजूर वो बोलते है. संभाजी सैतान है. शिवाजी से जादा वो संभाजी सैतान. है”

औरंगजेब : “दख्खन पर ये हिंदुस्तान का बादश पाच लाख की फौज लेकर भी मार खायेगा. कुच्छ भी करो संभाको पेश करो हमारे सामने जिंदा या मुर्दा.”.

असद खान : “हुजूर... वो संभा सैतान है।”

औरंगजेब : “तो हम कहां सैतान से कम है!” संभा को गिरफ्तार करणे के लिये क्या करणा चाहिये. बातादो उन नालायक सरदारों को कुच्छ भी करो संभा पकडना चाहिये. जिंदा या मुर्दा.”

*[औरंगजेब निघून जातो. शहाबुद्धीनचा राम सेज वर हल्ला जोराची लढाई होते रामसेजचा किल्लेदार सूर्याजी जेधे मराठा सैनिक दगडानेचं लढाई जिंकतात. शहाबुद्धीन मार खातो. दुसऱ्या बाजूने शहाबुद्धीचा प्रवेश बरोबर मोगल सैनिक असतात.]*

शहाबुद्धीन : “कैसे है ये मरहठ्ठे पत्थरो से खेळते है!”

सर्जाखान : “हा हुजूर ये मरहठ्ठे सैतान ..से भी सैतान है!”

फते खान : “मेरा तो भेजाही काम नाही कर राहा है. मुझे तो लागता...ये मरहठ्ठे भूत है भूत..ये दिन मे काम नाही करते सब रातकोही करते.”[राम सेज ६ वर्षे ६ महिने लढवला एकही बातमी चांगली येत नव्हती जवळ जवळ ६ वर्षात एकही किल्ला मराठ्यांनी मुघलांना दिला नाही लढत राहिले अहोरात्र स्वराज्यासाठी]

--पडदा--

# अंक २

[पन्हाळ गडाचा दरबार येसूबाई तुळशीला पाणी घालत असते आणि मागून गणोजी शिर्के प्रवेश करतात.त्याच्याकडे पाहून]

येसूबाई : "या, दादासाहेब."

गणोजी : "आता आपण रायगडच्या राणीसाहेब आहात. [मुजरा करतो.] तुमच्या साऱ्याच करोडो होनांचे हिंदवी स्वराज्य आता तुमच्या पायाजवळ पोहचले आहे."

येसूबाई : "दादासाहेब, आपण इकडे येण्या एवजी सरळ रायगडावर गेला असता, तर किती चांगल झालं असतं! "तिथल काम तिथली व्यवस्था".

गणोजी : "किती काळजी करशील येसू? संपले ते आपले एका जहागिरीपुरते दिवस, आता भाग्याचं सावली सारखं तुझी पाठराखण करते आहे."

येसूबाई : "त्याचं कशाचं श्रेय आम्हांला देता दादा? ही सारी देण आमच्या मामंजींसाहेबांची – शिवरायांचीचं! त्यांनी स्वच्छ हंड्यापातेल्या वरून आपल्या सुनेची पारख केली होती. खरे रत्न पारखी तेच!"

गणोजी : [विचार करत मोठा श्वास घेत] “येसू, महाराणीची वस्त्र पांगरल्यावर विसरणार तर नाहीस ना? तुझ्या या बंधुरायाला?”

येसूबाई : [हसत] “किती गंमत कराल बहिणीची दादा!”

गणोजी : “तसं नव्हे गं, आम्हां गरिबांच इतकचं म्हणण, आता तुम्हा सर्वांचा भाग्योदय झालाच आहे. त्यातले चार किरण वळू देत आपल्या भावाकड.”

येसूबाई : “असं कोड्यात काय बोलता दादा!” [संभ्रमित होऊन]

गणोजी : “कोड्यात कसलं? स्पष्टच बोलतोय. एकदा सत्ता आली की विसरायला होतं. म्हणून वेळेतच आठवण करून दिलेली वरी!” [येसूबाई अचंबित होऊन पाहतच राहिल्या.] ज्या दिवशी महाराणी म्हणून रायगडावर तुझ्या डोक्यावर छत्रचामर ढलतील, त्याच दिवसही आपल्या बंधूच्या घरादारावरती एक छोटसं तोरण बांधशील तर उपकार होतील.”

येसूबाई : ‘कसलं तोरण?’

गणोजी : “वतनाच!” ...

येसूबाई : “कसलं वतन दादासाहेब!”

गणोजी : “आम्ही राजेशिर्के आहोत. नव्याने आम्हाला काही नको पिढ्यान पिढ्या चालत आलेलं दाभोळच्या देशमुखीचे वतन आम्हांला देऊन टाका.”

येसूबाई : [बावरून] “दादासाहेब राजवाड्यात तूर्त गडबड आहे. राजे अजून रायगडावर गेलेले नाहीत. त्यांनी अजून कारभाराची सूत्रेही अजून घेतलेली नाहीत. तेव्हा थोडं सबूरीन घ्या.”

गणोजी : “आम्हांला वतन मिळणार की नाही ते सागा.”

येसूबाई : “मी राजांना विचारते.”

गणोजी : [हट्टाल पेटून दात ओठ खात बोलत होते] “गुन्हा आमचा नाही, तुझ्या त्या थोर सास-यांनं आम्हां शिर्क्यांवर केलेला हा जुलूम आहे. केवळ दबावान त्यांनी आमचं दाभोळच परंपरागत वतन खालसा केलं.”

येसूबाई : “स्वता:च्या स्वार्थासाठी दादासाहेब शिवरायांना दोष देता?” आपण स्वत:त्याच शिवाजीराजांचे जामात आहात हे विसरत आहात आपण”. दादासाहेब कोणालाही वतन देऊ नये असचं मामंजींच धोरण होत ना?”

गणोजी : “हे बघ, आम्हां वतनाशी तुम्हां भोसल्यांच्या काडीमात्राचा संबंध नाही.[संतापाने] दाभोलच वतन आम्हांला विजापूरच्या आदिलशाहान बक्षिस दिलं होतं. आम्ही तुमच्याकडे भीक मागत नाही. आमचा हक्क मागतोय.”

येसूबाई : “क्षमा करा दादासाहेब” थोडा वेळ काळ पहा; तुमचे सख्खे मेहुणे शंभू राजे आता स्वराज्याचे नवे सम्राट होत आहेत’. त्यांच्या पाठीशी खंबीर उभं राहायचं सोडून.”....

गणोजी : “म्हणूनच म्हटलं याद करून द्यावी. निदान तुमच्याकडून तरी न्याय मिळेल.”

येसूबाई : “वतणा सारख्या नाजूक विषयावर आम्ही कसा काय घाईगडबडीत निर्णय घेणार? आपण हवं तर राजांना भेटू शकता. चारही बाजुनी राजे संकटात असताना आपण राज्यांना धीर द्यायचं सोडून, नको त्या गोष्टीसाठी वाद घालता; हे योग्य नाही दादासाहेब.”..

गणोजी : “काय योग्य आणि काय अयोग्य हे तू आम्हांला शिकाऊ नकोस. वतनाचे कलम जो पर्यंत मार्गी लागत नाही. तोपर्यंत आम्ही तोंड दाखवणार नाही.” [अशी प्रतिज्ञा घेवून गणोजी निघून जातो.]

येसूबाई :[काहीशा घाबरल्या सारख्या आवाजात.] “चारही बाजूनी शंभूराजे संकटाने घेरले असताना स्वकीयानाच अशी दुर्बुद्धी सुचावी. घरातीलच विश्वासाच्या माणसानीच विश्वास घात करावा. शिवरायांनी उभं केलेलं हे स्वराज्य यवनांच्या तावडीतून वाचवाव यासाठी शंभूराजे अहोरात्र घोड्यावरच शिंहासन घेऊन बारा आघाड्यांशी लढत आहेत. कारभाऱ्यांनी धोका दिला, फितुर्रांचे लोंढेच्या लोंढे मुघलांना जाऊन मिळत आहेत. आणि घरातील मानस समजून घेत नाहीत. आता राजांना सावध करायला हवं.” [निघून जाते.]

[पन्हाळ गडाचा दरबार संभाजी राजे बसलेले असतात आणि हंबीरराव मोहिते मुजरा करत प्रवेश करतात.]

शंभू राजे : “या मामासाहेब, काय बातमी आणली आपण.”...

हंबीरराव मोहिते : “शंभूराजे मुघल सरदार गेली अनेक वर्ष राम सेज वर चढाई करतात पण सूर्याजी जेधे किल्ला शर्तीने लढवत आहेत.”

शंभू राजे : “मामा साहेब, मराठ्याचा जन्म विजांच्या कडकडात अन तोफांच्या गडगडाडात झालाय, स्वराज सहजा सहजी आम्ही कोणालाही देणार नाही. पोर्तुगीजांना थयथय नाचवलं, इंग्रजांची मस्ती जिरवली, पाण्यावर तरंगणारा तोफखाना बांधला. रयतेवर पोटच्या पोरावानी प्रेम केलं. कर्नाटक, त्रिवेंद्रम, चेन्नई, मद्रास, तामिळनाडू, पाषाणकोट सगळ सगळ जिंकल. मराठे तलवारीच्या टोकावर मरण घेऊन हिंडतात..हे माहित नाही वाटत त्यांना?”..

हंबीरराव मोहिते : “राजे एक वाईट बातमीही आहे.”

शंभू राजे : “ती कोणती मामासाहेब?”

हंबीरराव मोहिते : “फितुरीही वाढत आहे...गणोजी शिर्के मुघलांना मिळाले. अशी पक्की खबर हेरांकडून समजते.”

शंभू राजे : काय? गणोजी शिर्के.. “नात्याचे पदरचे जर, स्वराज्याची कदर करत नसतील तर; ते काय कामाचे.” मामासाहेब या स्वराज्यात काय कमी होत त्यांना.....

[कवी कलश : प्रवेश करतात मुजरा करत.]

कवी कलश : “राजे दु:खाची बातमी आहे.” [मुजरा करत.]

शंभू राजे : “बोला कविराज, बोला आम्हाला त्याची सवय झाली आहे.”

कवी कलश : “कोंडाजी मुघलांना मिळाले.”

शंभू राजे : “काय? कोंडाजीबाबांनी, पण हाच मार्ग धरला. स्वराज्य निर्माण करण्यासाठी आबासाहेबांच्या खाद्याला खांदा देऊन ज्यांनी हे हिंदवी स्वराज्य निर्माण केलं. त्यांनाच अशी वाईट बुद्धी सुचावी यापेक्षा वाईट कोणती गोष्ट कविराज?” आपलेच घरातील लोक परकीयांची चाकरी करत असतील तर; हे स्वराज्य निर्माण कुणासाठी करायचं? आणि कशासाठी?”

कवी कलश : “जहागिरी, वतने, सुभेदारी, अशी आमिषे देण्याचं काबुल केलय औरंगाजेबाने, या सर्वांना

शंभू राजे : “स्वता:चा स्वाभिमान ज्याला कळत नाही. स्वार्थासाठी आपल्या आया बहिणी मुघालाच्या दावणीला बांधणारे आम्हाला हवेतच कशाला. अजून कोण कोण आहेत अशे नमक हराम, ते सापडतील तिथे त्यांची खांडोळी करा. अशी नालायक नमक हराम माणसे स्वराज्यासाठी धोखादायक आहेत.”

हंबीरराव मोहिते : “शंभू राजे, निंबाळकर, जाधव, महाडिक ही आपली मानस मुघलांच्या संपर्कात आहेत.” अशी खात्रीशीर बातमी आहे.

शंभू राजे : “मामा साहेब, संताजी, धनाजी, रायप्पा, ज्योत्याजी, म्हाळोजीबाबा, येसाजी, कवी कलश यासारखी जीवाला जीव देणारी मानस या शंभू राजांबरोबर असली; तर आम्हांला हजार हत्तीच बळ येत. या शिवरायाच्या स्वराज्याच रक्षण करण्यास आम्ही कुठेही कमी पडणार नाही. मग जाणारे जाऊदेत वाटेल तिकडे त्यांची आम्हाला परवा नाही.”

हंबीरराव मोहिते : “होय राजे, बाकीची रयत आपल्या बाजूने आहे. त्याना शंभू राजांचेचं स्वराज्य हवे.”

कवी कलश : “होय, राजन.”

शंभू राजे : [शून्यात पाहून.] “एकीकडे पुण्यप्रतापी आबासाहेब कैलासवासी झाले. दुसरीकडे पिसाळलेल्या हत्तींचा झुंडी सारखा औरंग्या हिंदवी स्वराज्यावर चालून येत आहे. आशावेळी आम्हाला आधार देण्याएवजी आपल्या किंचित स्वार्थासाठी आणि छोट्याशा आकांक्षासाठी कारभाऱ्यांनी राजद्रोहाचा घाट घातला. नऊ दहा वर्षाच्या

अजाण पोराला राज्यपदाच बाशिग बांधण्याचा पोरखेळ करून पाहिला. एवढे होऊनीही आम्ही गप्प बसलो, त्यांना दंड केले नाही. मोठ्या मानाने आम्ही पुन्हा सर्व कारभार त्यांच्याच हाती सोपवला. प्रधान पदाची सुवर्ण कंकण बांधली त्याना ज्या घोड्यावरून उतरवल होत. त्याच घोड्यावर पुन्हा बसवलं. राज्यशात्राच्या राजद्रोहाच्या अक्षम्य गुन्हासाठी आम्ही त्यांना टकमकिचा रस्ताही दाखवला नाही. त्यांनी मात्र त्याचा विचार केला नाही. पुन्हा पुन्हा तोच गुन्हा केला. आमच्या अन्नामध्ये विष कालवले! त्यांच्या या पुण्य कर्मासाठी राजनं झुकाव काय?"

कवी कलश : "राजन, आपण केलेली शिक्षा योग्यच आहे."

शंभू राजे : "पोरासारख मी रयतेवर प्रेम करतोय, आबासाहेबांच्या नंतर त्यांची उणीव मी कधीही भासू दिली नाही. ती जनताच हे स्वराज्य वाचवेल. मामासाहेब, त्या औरंगजेबाचे फासे कुठेकुठे पडत आहेत याची कल्पना आम्हांला देत जा.".

हंबीरराव मोहिते : “होय राजे, निघतो आम्ही ...[प्रतापराव मुजरा करून निघतात. संभाजी राजे शिहासानावर बसतात. येसूबाई येतात. मुजरा करतात कवी कलशही मुजरा करून निघून जातात.]

शंभू राजे : “ये येसू ये.! ..बसा आम्हाला तुमच्या सल्ह्याची गरज वाटते.”

येसूबाई : “बोला राजे!”

शंभू राजे : “येसू, आम्हाला कधीकधी वाटत. ही भूमी फक्त ज्ञानवंतांची, संत महंतांची नाही. कृतघ्नाची, फितुरांची आणि दलबदलुंचीही आहे. ती फक्त राज्यासाठी आपली शिरकमल वाहणाऱ्या काझींची नाही; तर जमीन जुमल्याच्या किंचित तुकड्यासाठी, आपल्या किंचित स्वार्थासाठीसुद्धा इमानाची, स्वराज्याची विक्री करणाऱ्या वाजींची देखील आहे.”

येसूबाई : “माफ करा राजे, आमच्या माहेरच्यांनी आपणास दगा दिला.”

शंभू राजे : “ऐसू, तुझ्या माहेरच्यांच काय? आमचं आजोळ तर; मोघलांच झालय. येसू ज्यांनी पोर्तुगीजांना थयथय नाचवलं, इंग्रजांची मस्ती जिरवली, पाण्यावर तरंगणारा

तोफखाना बांधला. रयतेवर पोटच्या पोरावानी प्रेम केलं. कर्नाटक, त्रिवेंद्रम, चेन्नई, मद्रास, तामिळनाडू, पाषाणकोट सगळ सगळ जिंकल. हे सगळ कुणासाठी अन कशासाठी.?..

येसूबाई : “राजे, असे निराष होऊ नका. आपल्या बरोबर मामासाहेब, मानाजी, रुपाजी, संताजी, धनाजी सारखे सूर वीर आहेत. आपण त्या औरंग्याच्या पाच लाख फौजेला पुरे पडू. सारी प्रजा तुमच्या बरोबर आहे. मुठभर लोकांनी तोंड काळ केलं म्हणून काय झालं. आबासाहेबांनी एकेक मावळा जमवून स्वराज्याचं तोरण बांधल आपल्याला माहितचं आहे. ना राजे?”

शंभू राजे : “खरचं ऐसू, तुझ्यामुळे आम्हाला रणांगणात लढण्याची उर्मी येते.”

येसूबाई : “राजे, आपलं शौर्य त्या औरंग्याला चागलं माहीत आहे. तो काळसर्प आला अंगावर तर घेऊन टाकू तलवारीच्या टोकावर. गरज पडलीचं तर आम्हीही उतरू रणांगणात तुमच्या बरोबर!” [त्वेषाने बोलते.]

शंभू राजे : “वा! येसू वा! खरोखरच तू आबासाहेबांनची सुन सोबतेस, तो औरंग्या आमच्या समोर आलाच, तर इथंच त्याची कबर बांधू आम्ही.”

येसूबाई : “चला राजे, शत्रू आपल्या मागावर आहे. आपल्याला सावध राहील पाहिजे.”

शंभू राजे : “होय, येसू किती काळजी करशील आमची.” [निघून जातात]

**[औरंगजेबाची छावणी तो सिंहासनावर बसलेले असतो. शिपायाला सर्जाखानाला बोलावण्याचा निरोप देतो.]**

औरंगजेब :[शिपायाला हुकुम देतो.] “सर्जाखान को बूलावो.” [सर्जाखान येतो मुजरा करतो.] “सर्जा आम्ही विजापुरभोवतीच्या कुप्रसिद्ध तटाची पीठ फोडली गोवलकोंडा उखडून खंदकात फेकून दिला. सच बोलू, ही काही बहादुरी नाही. एकाच दु:खाणे आमचा कलेजा करपून निघतोय!” संभा..बराबर सर्जा बेटे.”.

सर्जाखान : “जी, पातशहा सलामत!”

औरंगजेब : “तू तर विजापूरचा सिपाहसालार होतास. आज हमारे सरदार हो.”

सर्जाखान : “जी, हजरत!”

औरंगजेब : “त्या काफर संभाला गाडण्याची औकात ना माझ्या तीन शहजाद्यात, बावीस नातवंडात, तीस सरदारामध्ये आहे. त्या शैतानाच्या अंगात तुझ्या सारखाच एखादा दख्खनवी गाझी, पेंढा भरू शकतो. जा निकाल जा जल्दी, हवी तितकी फौज आणि चाह्शील तेवढा खजाना और रसद सोबत घे, आणि त्या काफर संभाजीला आमच्यासमोर हजर कर जिंदा मुर्दा! जब तक संभा गिरफदार नही होता तब तक यह हिंदुस्तान का शहनशा ताज नही पेहनेगा अपने सिरपर !”

सर्जाखान : “जी हुजूर.!.हम संभाको पेश करेंगे. जिंदा या मुर्दा.”

औरंगजेब : “और सून बेटा सर्जा जर संभाची गर्दन छाटून आणशील तर तुझं नशीब सिकंदर ठरेल! दख्खनमधून तुला वाजत गाजत, तुझा जुलूस काढत आम्ही तुला उत्तरेत नेऊ. लाल किल्याच्या पायरीवर खिलतीचा पेहराव देऊन तुझा सन्मान करू.”

सर्जाखान : “जहाँपन्हाँ, आम्ही जरूर कोशीश करू.”

औरंगजेब : “संभा मिलना मुश्कील है!” पण तो न मिळेल तर त्याची एखादी तंगडी, एखादा हात तोडून –“मतलब?’ त्याचा एखादा बड्यात बडा किल्ला – जैसा रायगड, राजगड, पन्हाळा, प्रतापगड या हंबीरगड लेके आव, खाली हात मत आना!”

सर्जाखान : “जरूर, जहाँपन्हाँ जरूर.”

औरंगजेब : “तो फिर जाव!” .... [सर्जाखान मुजरा करून जातो. मागून दाढीवर हात फिरवत या अल्ला ..करत औरंगजेब जातो.]

** [सगळीकडे अंधार रात किडयाचा किर्र किर्र असा आवाज सगळीकडे[पाचगणीच्या जंगल हातात तालावर घेऊन हंबीरराव व नारोजी भोसले धावत येतात.]**

हंबीरराव मोहिते : “त्या औरंग्याला दफन केल्या शिवाय हा हंबीरराव पाठ टेकणार नाही.” [समोरून कसला तरी आवाज येतो.] कोण आहे रे तिकडे

[समोरून जानू नावाचा शिपाई येतो.]

हंबीरराव मोहिते : “काय रं ज्ञानू? काय खबर हाय?”

जानू : “सरकार.. आपल्या मुलखावर औरंग्यान सर्जाखानाला धाडलाय. सर्जाखान इकडचं धावून आलाय.

हंबीरराव मोहिते : “काय? कुठं? कुठल्या बाजूला आहे वैरी”?

जानू : “कृष्णा नदी ओलांडीत हुतं.”

हंबीरराव मोहिते : “किती फौज आहे त्याच्या बरोबर?

जानू : “असलं दहाबारा हजार.”

हंबीरराव मोहिते : -“आणि दिशा कुठली धरलीय त्यांनी?”

जानू : “प्रतापगडावर चाललाय म्हण. प्रतापगड दोन दिवसात जिंकायचा विडा उचललाय खानान.”

हंबीरराव मोहिते : “नारोजी आता काय करायचं? आपली मुख्य फौज तर आंबा घटान खाली कोकणात गेली आहे.”

नारोजी भोसले : “सेनापती ..काहीही करून वैऱ्याला रोखलं पाहिजे. त्यांनी प्रतापगड गिळला तर अब्रूचं खोबरं होईल आपल्या!”

हंबीरराव मोहिते : “असं कसं होऊ देऊ आम्ही? औरंग्यान भले आदिलशाही आणि कुतुबशाही गिळली असेल, अजून जंग जंग पछाडूनसुद्धा शंभूराजांच्या सह्याद्रीतला एकबी

किल्ला पडलेला नाही. आमचे किल्लेदार प्राणपणाने किल्ले लढवत आहेत. म्हणूनच पाठलाग करून वैऱ्याला वाटेतच अडवू समोर आला, तर घेऊन टाकू तलवारीच्या टोकावर!"

नारोजी भोसले : "पण, हंबीरपंत, ही वाट खूप अडचणीची आहे. घोड्या माणसांचा पिटटा पडलं."

हंबीरराव मोहिते : "नारबा... वैराणीसारख्या आलेल्या वेळेवर दुसरा इलाज नाही. चला.. वळवा घोडी. फिरा मागं...बोला हर हर महादेव...

[घोड्याच्या टापांचा आवाज निघून जातात..]

**[पाचगणीच्या गुलाबी थंडीत खान पडलेला.तेवढ्यात "हर.हर महादेव ..चा कल्लोळ उठला दुसऱ्या बाजूनी हंबीररावंचं सैन्य खानवर तुटून पडत कापाकापी होते. सर्जाखान पळून जातो. हंबीरराव प्रवेश करतात बरोबर नारोजी व काही सैनिक असतात.]**

हंबीरराव मोहिते : "आज वाचलास, सर्जाखान! पण एक लक्षात ठेव आमचा एक शिपाई तुझ्या दहा शिपायांना भारी आहे. नारोबा, लागल्याच हातानं त्यांचं कांडात काढू.

कृष्णाकाठाची ही सर्जाखानाची विखारी ढाली मुळासकट उपटून काढू."

शिपाई : "होय, सरदार, त्या सर्जाखानाला इथचं गाढू."

हंबीरराव मोहिते : "चला रं पोरानो -! माझा शंभूराजा तिकडं वाट बघतोय. अजून अशी कैक मैदानं मारायची आहेत, ह्या आमच्या वैऱ्याना मारून जन्माचं सार्थक करू."

[हर..हर..मदादेव म्हणत निघून जातात. पडद्याच्या मागून तोफांचा आवाज हरहर महादेवच्या गर्जना..दिन..दिन.]

***[हंबीर मामानां गोळा लागून धरातीर्थी पडतात ही बातमी रायगडावर पोहचते.]**

**@ पडदा @**

[रायगडचा दरबार संभाजी राजे भ्रमिष्ठ होऊन सिंहासनावर बसलेले असतात. दरबारात येसूबाई बरोबर असतात. येसाजी कंक, म्हाळोजी घोरपडे, प्रल्हाद निराजी ही बुजुर्ग मांडली असतात हंबीर मामानां गोळा लागून धरातीर्थी पडतात ही बातमी रायगडावर पोहचते. घनगंभीर चित्तवृत्तीच्या शंभूराजांना हुंदका आवरत नव्हता.]*****

संभाजी राजे : “पहाडासारखे आमचे आबासाहेब आम्हांला सोडून गेले, तेव्हाही आम्ही इतके मनातून हादरलो नाही. कारण पित्यासमान असणाऱ्या मामासाहेबांनी पितृवियोगाची आठवण आम्हांस कधीचं होऊ दिली नाही. आम्हांला आधारासाठी हंबीरमामांचा खांदा होता. आता तो खांदाच निखळला तर जायचं कुठं आम्ही.”

येसाजी कंक : “राजे.. ही जगरहाटी आहे. आमच्यासारखे म्हातारे एक दिवस जायचेच आहेत. आता खंडोबल्लाळ, धनाजी, संताजी अशी नवी पोर आहेत. त्यातून घडवू एखादे नवे हंबीरराव!...” [संभाजी राजे सिंहासनावरून उठले स्वता: सावरत म्हाळोजी घोरपडे यांच्याकडे पाहत.]

संभाजी राजे : “औरंगजेबासारखा दुश्मन अनेक फासे टाकत आहे. अशावेळी स्वराज्याचा सेनापती म्हणून आम्ही म्हाळोजीबाबा तुम्हाला सेनापतीची वस्त्रे देत आहोत.” [वस्त्रे दिली जातात सर्वजण आनदाने म्हाळोजीबाबांचे कौतुक करतात.]

म्हाळोजीबाबा : “राजे... आमच्या जीवात जीव असेपर्यंत आाही स्वराज्याचे रक्षण करू.!”

संभाजी राजे : “म्हाळोजीबाबा, आज या क्षणा पासून तुम्ही स्वराज्याचे सर सेनापती आहात.”

प्रल्हाद निराजी : “म्हाळोजी संग आम्ही हाय, राजे ..वेळ बाका हाय.’ पुढील कामगिरीसाठी निघाल पाहिजे. शत्रू दिवसेन दिवस जवळ येत हाय.”

संभाजी राजे : “होय, निराजीबाबा आपल्या सारख्या अनुभवी बुजुर्गावारच हे स्वराज्य उभं आहे.” आबासाहेबांनंतर आपण सर्वांनी स्वराज्याची घडी बसवलात. त्याबद्दल तुमचे सर्वांवांचे आभार मानायला शब्द अपुरे पडतील आमचे!”

म्हाळोजीबाबा : “शंभूराजे... हे स्वराज्य आम्हां सर्वांच, आपल्या रयतेच आहे. त्यात आभार काय मानायचे.”

संभाजी राजे : “म्हाळोजीबाबा..स्वराज्याला चारही बाजूने यवनांनी घेरले असताना जवळची माणस यास्वराज्याला सोडून परकीयांना सामील झाली. ज्या कारभाऱ्यांवर विस्वासाने राज्यकारभार सोपवला त्यांनीच आमच्याशी गद्दारी केली. आमच्या अन्नात विष कालवल. आशा वेळी आपण सर्वांनी आम्हांला सावरलं आपल्या मुलासारख आमच्यावर प्रेम केलतं या हिंदवी स्वराज्यचे

खरे शिलेदार आपण आहात. अशावेळी आभार मानू तर काय करू आम्ही म्हाळोजीबाबा.”

म्हाळोजीबाबा : “आता झालं गेलं गंगेला मिळालं. राजे आम्हांस पुढील कामगिरीची आज्ञा द्यावी.

येसाजी कंक : “होय, राजे, पुढील कामगिरीसाठी आम्हांला आज्ञा द्यावी.”

संभाजी राजे : “ठीक आहे. म्हाळोजीबाबा सैन्य तयार ठेवा. देऊ धडक त्या औरंग्याला.”

म्हाळोजीबाबा : “जी राजे!” ...[मुजरा करून सर्वजण निघतात]

संभाजी राजे : “येसू, स्वराज्याचा एक शिलेदार गेला. माझा हंबीरगड गेला. फार वाईट झाले. अहोरात्र या स्वराज्यासाठी अखंड आयुष्य दिले. आज आम्ही अजून पोरके झालो.”

येसू : [जवळ जाऊन] “राजे.. आज सर्व रयतते दुष्काळ असुनही रयत आपल्या पाठीशी उभी आहे. निघेल याच्यातुनही मार्ग. आपण राजे आहांत असं दु:ख करून चालणार नाही. काळ या स्वराज्यावर केव्हा घाला घालेल याचा नेम नाही. आपण या दु:खातून सावरलं पाहिजे अन रयतेलाही धीर दिला पाहिजे राजे.”

संभाजी राजे : “होय, येसू! पण दैवान आम्हांस इतकं का पोरकं करावं? आम्हीं या जगात आलो ते पोरकेच.”

येसू : “असं का बोलता राजे? आम्ही आहोत ना आपल्या बरोबर.”

संभाजी राजे : “पाहाना राणीसाहेब आम्हीं नासमज असतानाच आमच्या मासाहेब आम्हांस सोडून गेल्या. आऊसाहेबानी आमचं पालन पोषण केलं. आबासाहेबांच्या प्रेमासाठी आम्हीं कित्तेक दिवस तरसत राहिलो. तेही सोडून गेले. आज मामासाहेबही सोडून गेले. विश्वासाच्या माणसांनी दगा दिला. आमच्यावर सर्व बाजूनी संकटांचं आभाळ कोसळ आहे. अशावेळी मी काय करू, येसू?”

येसू : [खांद्यावर हात ठेऊन] “राजे आपण शूर, पराक्रमी आहात. आपल्या पराक्रमाची नांदी आपण आग्रा भेटीतचं त्या औरंगजेबाला दाखवली आहे. मराठ्यांचा एकही किल्ला पडत नाही. ते आपल्याला क्षरण येतं नाही. म्हणून तो आपल्याला घाबरून दक्षिणेला गेला. याची जाणीव आपणास आहे. पुऱ्या हिंदुस्तानात औरंगजेबाशी टक्कर एकच देऊ शकतो, तो, शिवपुत्र संभाजीराजे, असं असताना.”

संभाजी राजे : [डोळे पुसत येसुकडे पाहत थोडावेळ थाबुन.] “येसू आज तू माझ्यातील अग्नी जागा केलीस. आता येउदे त्या औरंगजेबासारखे हजारो शत्रू हा शिवपुत्र संभाजी या मराठी मातीसाठी, हिंदवीस्वराज्यासाठी आपले प्राण देण्यास कधीही तयार आहे.”

येसूबाई : [जवळ जाऊन खांद्यावर हात ठेऊन.] “राजे.. आपल्या पराक्रमावर आणि शिवराय मासाहेबांच्या पुण्याईवरचं हा महाराष्ट्र आज उंच ताठ मानेन उभा आहे.”

संभाजी राजे : “येसू, आज इतके दिवस तू रायगडचा कारभार जातीनिशी सांभाळलीस. येसू, अजून काही दिवस सांभाळलीस, तर आम्ही आसमान दाखवू त्या औरंग्याला. येसू, त्या औरंग्याला एकदाची या शिवपुत्र संभाजीची ताकत काय आहे हे दाखवायचा विचार आम्हीं पक्का केलाय. त्यासाठीच आज आम्ही सर्व सरदारांना आज दरबारात बोलावन पाठवलं आहे. आबासाहेबांनी साठवलेल्या खजिन्याची आम्ही उधळपट्टी केली नाही. म्हणून तर वैऱ्याच्या सेना सागराला आज सहा वर्षे सामना करू शकलो. दुर्दैवान सतत तीन वर्ष दुष्काळ असूनही रयत या सभाजीच्या

पाठीशी पहाडासारखी उभी राहिली त्यांचे कसे आभार मानू आम्हांस कळत नाही. येसू.”

येसूबाई : “दुर्दैवान सतत तीन वर्ष दुष्काळ असूनही आपण जिद्दीनं झुंजत आहात, त्याला तोड नाही राजे! या पातशाहाला यापूर्वी असं कधीचं कुणी हैराण केलं नव्हतं राजे ते ह्या शिवपुत्र संभाजीन करून दाखवलं; त्याला जेरीस आणलं. अजून काही दिवसांतच तो पळून जाईल या महाराष्टाच्या छाव्यांना घाबरून.”

संभाजी राजे : “पण..येसू ...[तेवढ्यात म्हाळोजी, सूर्याजी, कवी कलश एका बाजूने व संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडो बल्लाळ दुसऱ्या बाजूने प्रवेश करतात मुजरा करतात] या माळोजीबाबा बरं झालं अगदी वेळेवर आलात. आम्हीं आपलीच सर्वांची वाट पाहत होतो.”

म्हाळोजी : “राजे..एकदाची घालवी झडप म्हणतोय त्या औरंग्याच्या”.....

संभाजी राजे : “थांबा म्हाळोजी बाबा..हे निर्णायक युद्ध आता सह्याद्रीच्याकडेकपारीत आणि त्याच्या पायथ्याचा मुलुख इथंच खेळू. त्यासाठी तर आम्हीं खानदेश, बागलाण, नाशिक भागातील बहुतांशी फौजा काढून

घेतल्या असून. सार सैन्य सह्याद्रीकड वळवल आहे.''
''पन्हाळा, शिरवळ, पुणे, चाकण, पनवेल, चौल, हरिहरेश्वर ते पुन्हा संगमेश्वरहून विशालगड, पन्हाळा असं पोलादी कड आपण बांधत आहोत. आपला हा चक्रव्यूह भेदून माणसच काय, मुंगीही आत प्रवेश करू शकत नाही. हे कड असं शिस्तीनं आणि मस्तीन झुंजत ठेऊ की, तो बुढ्ढा पातशहा इथचं पूर आयुष्य लढत राहीलं.''

कवी कलश : ''वा! राजन वा!''

संभाजी राजे : ''कविराज... पन्हाळा आणि विशालगडाच्या जंगली परिसर म्हणजे आमच्या राज्याचा पोलादी बाहु आहे. तुम्ही तिकड दक्ष राहा. पहारे जागत ठेवा.''

कवी कलश : ''राजन, आपण निश्चित असा. माझ्या घोड्यांनी आज पर्यंत कधीही पराभव बघितला नाही. मलकापूरची पागा हे माझे सामर्थ्य आहे. ''राजे, काव्यानंदाच्या कैफात आपल्या संगतीनं मी सरस्वतीचा देव्हारा उजळून टाकला होता. राजे, तुमच्यासंगे जगण्यात मला नेहमीच मोठी मौज वाटली. आपल्यासाठी मारण्यातही सुखाचा स्वर्ग संपादन करू!''

संभाजी राजे : “कविराज..आपण स्वराज्याचे पाईक आहात हे आम्हांला चांगलं माहीत आहे.” [संभाजी राजे धनाजीकडे पाहतात तेव्हा धनाजी हसून..]

धनाजी जाधव :[मुघलांना उद्देशून] “राजे, गोमीला कितीही पाय असू दे. तिचं कंबरड एकदा ठेचल, की ती गळून पडते. आम्हांला जी जोखीम आपण सोपवली आहे तिचं निश्चितचं सोन करू. या मातीसाठी मरण पत्करू.”

संभाजी राजे : [संताजीला जवळ बोलून] “संतोबा, तुझ्यावर तर आमचा दांडगा भरवसा नुकतीच तू जिंजीपर्यंतची दौड करून परतला आहेस. जिंजीऱ्याची पाण्यातील मगर किती जहरी आहे. हे आम्ही पुन्हा तुला स्पष्ट करायची गरज नाही. तो सिद्धी लुच्चा आहे. ऐनवेळी दगाफटका करेल. म्हणूनच तुम्ही हरिहरेश्वरपासून पनवेलपर्यंत धावते राहा.”

संताजी : “राजे, ह्या किनारपट्टीची काळजी सोडा. आपण ही जोखीम माझ्यावर सोपवलीत मी धन्य झालो. आपला विश्वास आम्ही सार्थ करून दाखवू. प्रसंगी त्या सिद्धीला बिळातच कोंडून ठेऊ.”

संभाजी राजे :[बोलता बोलता सर्वांकडे नजर फिरवत सहज खडा टाकतात.] “दोस्तहो, वाटतं तुम्हांला, हा भय पर्वत ओलांडून आम्ही पुढे जाऊ शकू?”

खंडो बल्लाळ : “का नाही. का नाही राजे?” “राजे, आपण खूप भोगलं, खूप सोसलं. सायाद्रीतील एकही किल्ला आपण त्या कोल्हाच्या, औरंगजेबाच्या तावडीत अद्यापि जाऊ दिलेला नाही. थोरल्या राज्याच्या आरमारातील एकही जहाज कमी झालेले नाही. उलट त्यात साठ सत्तर मोठ्या जहाजांची भरचं घातली. एवढी मोठी ताकत आपल्या पाठीशी असताना एकच काय, आणखी पन्नास वर्षे त्या पापी औरंग्याच्या सेनासागराशी सहज मुकाबला करू!”

संभाजी राजे : “गड्यानो, औरंगजेबासारख्या कळीकाळाशी मुकाबला करण्यासाठी शक्य असेल तेवढं सर्व काही आम्ही केलं. तुमच्याच साथीनं जिंजीरेकर सिद्धीला असा ठेचून काढला की पातशहासारखा त्याचा एवढा बडा दोस्त जवळपास येऊनही तो जिंजीऱ्याच बीळ सोडून बाहेर आला नाही. गोवेकर पोर्तुगीजांची आम्ही मस्ती जिरवली. इंग्रजांना आपल्या वखारी सोडून बाहेर पडू दिलं नाही. तामिळ आणि कर्नाटकात दोन दोन मोहिमा

काढून तिथल्या गडकिल्ल्यांच्यावर भगवा झेंडा फडकवला. विजापूर आणि गोवलकोंडेकरांशी दोस्ती करून दिल्लीकर कोंडला. पाच लाखाचा सेना सागर असूनही आठ आठ वर्षे नाचवला. तुमच्या सर्वांच्या साथीन महाराष्टाला वाचवला!"

[सर्वजण "वा राजे वा!]

संभाजी राजे : [कडकडत्या बिजालीसारखी नेत्रातली बुबुळे चमकली. मुठी आवळून राजे गरजले.] "एका शिवाजीराजांच्या लौकिकासाठी आणि या महाराष्ट्राच्या मातीसाठी अशा शंभर संभाजीच्या मुंड्यांचा सडा रणांगणावर पडला तरी बेहत्तर! चला मार्दनो बोला."

[ हर..हर महादेव...त्वेषाने निघून जातात.]

** [पूर्ण अंधारी रात्र गणोजी शिर्के, मुखरब खान, इखलास खान संगमेश्वरचा रस्ता चालत असतात.]**

मुखरब खान : “गणोजी राजे, संगमेश्वरला पोचायला आपणास अजून किती दिवस लागती.”

गणोजी शिर्के : “बसं, खान साहेब उद्या सकाळ पर्यंत आम्हीं संगमेश्वरला पोहोचू.”

इखलास खान : ‘खान साहेब, कुठल्या ह्या मौतीच्या तळघरात घेऊन चालला आहात आम्हांला?’

मुखरब खान : “मै तो पेहले बोला था. ज्यांना मारायचं आहे, त्यांनीच माझी सोबत करावी.”

गणोजी शिर्के : “खान साहेब, मी आता तुम्हांला वाघाच्या घळीपर्यंत घेऊन आलो. माझे वाटाडे, रसद सारा बंदोबस्त तुमच्या सेवेला देतोच आहे. पण सरकार दया करा, मला इथून मागे जाण्याची परवानगी द्या.”

मुखरब खान : “आप पागल तो नही. गणोजी?”

गणोजी शिर्के : “खानसाहेब, कस सांगू तुम्हांला? ह्या डोंगर दऱ्यातील येडेखुळे लोक त्या शिवाजीला आणि त्याचापुत्र संभाजीला देव मानतात. समजा, उद्या कमी

ज्यास्त काय झालं – संभ्या हातातन निसटला तर मात्र तो आगीचा खेळ खेळेल. आमची मुळीडहालीही औषधाला मागं ठेवणार नाही.''

मुखरब खान : ''गणोजी घबराइये मत. आम्ही तुम्हांला सहीसलामत ठेऊ. आमच्या फौजेच्या मागे राहा. लेकीन किसी भी तौर आपको तो आनाही आना है!''

गणोजी शिर्के : ''पण, सरकार, माझे वाटाडे, रसद सारा बंदोबस्त तुमच्या सेवेला देतो. माझ्यावर दया करा, मला इथून मागे जाण्याची परवानगी द्या.'' [गणोजी हात जोडून बोलत होता. मुखरब खान भयंकर चिडून गणोजीची गळपटी धरतो.]

मुखरब खान : ''शिर्के, तू मला बेवकूफ समजतोस? मै तो मरुंगा लेकिन आपको साथ लेकरही मरुंगा. चलो. बचपना छोड दो –'' संभाजी निकल गया तो ये मराठे आम्हांला जिवंत सोडणार नाहीत. [भर भर सर्वजण निघून जातात.]

** पडदा **

**[संगमेश्वरच्या वाड्यात संभाजी राजे न्याय निवडा करण्यासाठी बसलेले असतात. समोर गोर गरि जनता अर्जोजी यादव तसेच येसूबाई, म्हाळोजी, संताजी, धनाजी, खंडो बल्लाळ. इ. बसलेले असतात.]**

संभाजी राजे : "बोला यादव काय असेल ते थोडक्यात सांगा. आम्हांला रायगडावर लगेच निघायचा आहे." रात्र वैरयांची आहे. हे स्वराज्य खूप अडचनीत आहे. [तेवढ्यात एक शिपाई येतो -राजे पालखी तयार आहे.] संभाजी राजे येसूबाईकडे पाहत राणीसाहेब आपण निघा पुढे. आम्ही येतोच मागून."

येसूबाई : "नाही राजे, आपल्याला मागं ठेऊन आम्हीं इथून निघणार नाही."

संभाजी राजे : "राणीसाहेब, आपण आमची काळजी करू नका. आम्ही धावत्या घोड्यावरून येऊ तुमच्या मागून."

येसूबाई : "राजे आजचा दिवस अशुभ वाटतो आम्हांला?" नका थांबू इथं ."

संभाजी राजे : "येसू, अगं असं कसं वागून चालेलं आम्हांला?" आम्हीं या मुलखाचे राजे आहोत." येसू, टाहो फोडणाऱ्या लेकाराकडे पाठ फिरवून आईचं मन पुढे जाऊचं शकत

नाही; तसचं दारात न्याय मागण्यासाठी उभ्या असलेल्या रयतेला ओलांडून राजा पुढे जाऊ शकत नाही.”

येसूबाई : “पण राजे, आपल्याला सोडून माझे पाऊल पढे पडत नाही.”

संभाजी राजे : [येसूबाईची समजूत घालत थोडं गमतीन.] “आज काय झालंय तरी काय तुला येसू? अख्खा महाराष्ट्र आपल्या करड्या शिस्तीच्या धाकाखाली ठेवणारी आमची महाराणी एखाद्या घरेलू सामान्य स्त्रीसारखी वागू शकते? राणी साहेब, कुठे गेला तो तुमचा धाक, दरारा, ती शिस्त?” “येसू, आम्हीं तुम्हांला शब्द देतो. तुमच्या मागून आम्हीं धावत्या घोड्यावरून आहोतच.” “तुमच्या बरोबर आठशे घोडी निघतील.”

येसूबाई : “इतकी कशाला?” मग आपणासोबत कोण?”

संभाजी राजे : “चारशे घोडा आहे आमच्या बरोबर. राणीसाहेब.”

येसूबाई : “राजाचं रक्षण महत्वाचं आपल्याबरोबर जास्त सैन्य पाहिजे राजे.”

संभाजी राजे : “आता वेळ घालवण्यात काहीच अर्थ नाही, नाहीतर सर्वच सापडू मोघलांच्या जाळ्यात” [संभाजी राजे ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत हे जाणून येसू जड

अंतकरणाने निघतात. मागे वळून पाहतात तेव्हा संभाजी राजे येसूकडे पाहत.] "एवढी चिंता कशाला करतेस येसू" एवढा भरवसा नाही तुला कोणावर आता?" सह्याद्रीच हिरवं रान, ही तांबडी माती, ह्या शिवपुत्र संभाजीला दगाफटका करेल, असं वाटतं की काय तुला?" "महाराणी, आमची चिंता करू नका. दुपारी पालखी चिपळुणात वाशिष्ठी नदीकाठी पोचेल. तुम्ही तोंडात घास घालता तोपर्यंत आम्ही तिथं हजर राहू." [येसू निघते. न्याय दानाला सुरवात करणार तेवढ्यात हेर येतो.]

हेर : "राजे...राजे .. घात झाला.[पडद्या मागून आवाज त्या आवाजाने राजे ताडकन व सर्वजण उठले हातात तलवारी घेतल्या इकडे तिकडे सर्वजण पाहतात] "राजे वैरी संगमेश्वरावर चालून येतोय. राजे हजार बाराशे स्वरांचा लोंढा या डोळ्यांनी बघितलाय, राजे!"

संभाजी राजे : पाखऱ्या....

*[राजांनी पाखऱ्या अशी हक मारताच घोडा आवाज करत राजांसमोर येतो. कवी कलश हातात तलवार घेऊन धावत येतात. पडद्या मागून "अल्ला हो अकबर!" "दीन ..दीन घोड्याच्या टापांचा आवाज. म्हाळोजी घोरपडे मोठ्याने हर..हर.. महादेव त्या*

*पाठोपाठ धनाजी, संताजीनी गर्जना दिली. "शिवाजी महाराज की जय," "संभाजी महाराज की जय," राजांसमोर मुखार्ब खान, इकलास खान तलवारी हातात घेऊन येतात बरोबर सैनिक असतात. म्हाळोजी, संताजी, धनाजी, कवी कलश, खंडो बल्लाळ.इ. मुघल सैन्यावर तुटून पडतात. मुखार्ब खान, इकलास व सैन्य माघार घेतं. पण या युद्धात म्हालोजीबाबा कामी येतात. मुखार्ब खानाने संभाजी राजे वरील मागून केलेला वार आपल्यावर घेतात. संभाजी राजे निसटतात व पुढील प्रवासाला निघतात.]*

**** पडदा **

[जंगल असलेला पडदा संताजी, धनाजी, कवी कलश, खंडो बल्लाळ संभाजी राजे प्रवेश करतात.]

संभाजी राजे : "गड्यानो.. आता आपण तलवारीची नव्हे तर; बुद्धीचीच लढाई खेळायला पाहिजे."

खंडो बल्लाळ : "म्हणजे कसं?"

संभाजी राजे : "इथं न थांबता पांगून पांगून जाऊ. संताजी-धनाजी तुम्ही क्षणभर थांबू नका. चला, वाऱ्यासारखी पुढे धाव घ्या."

संताजी : “पण राजे, तुम्हांला सोडून?”

संभाजी राजे : “नका रे आता एकदुसऱ्याच्या मायेत अडकू. संताजी आणि खंडोबा तुम्ही चिपळूणच्याचं वाटेने धाव घ्या. वाटेत येसू आणि राजस्त्रियांचे पालख्या मेणे भेटतील, त्याचं संरक्षण करा. धनाजी तू उरली सुरली आपली माणसं घेऊन हातखंब्याकडे निघून जा. काही बरावाईट प्रसंग उदभवला तर गोव्याकडची वाट रोखून धर.”

धनाजी : “- आणि राजे आपण?” [केविलवाण्या आवाजात.]

संभाजी राजे : “आम्ही व कवीराज आडवाटेन, झाडांचा, ओढ्यांचा आश्रय घेत वरच्या अंगान रायगडाकडे निघून जाऊ.” [सर्वजण एकमेकांकडे दु:खाने पाहू लागली. संभाजी राजांकडे पाहू लागली.] [राजे ओरडले] चला निघा.”

सर्वजण : “नाही राजे, आम्ही तुम्हांला एकट्याला सोडून नाही जाणार.”

संभाजी राजे : “पोरानो, तुमच्या हट्टाचा परिणाम विपरीत होईल. सारे मिळून जायचा प्रयत्न केला, तर कदाचित सारेच गिरफ्तार होऊ. अशानं अनर्थ ओढवेल. स्वराज्य संकटात येईल.”

संताजी : “राजे..! [असा हंबरडा फोडत राजांचे पाय धरू लागला. राजांनी त्याच्या डोक्यावरून हात फिरवत त्याच वेळी धनाजी आणि खंडो बल्लाळयांच्या खांद्यावर हात ठेऊन खांदे दाबत. धीर देत]

संभाजी राजे : [त्वेषान.] “चला पोरानो निघा.स्वत:ला वाचवा आणि स्वराज्यही वाचवा. दख्खनच्या मातीत औरंग्याची कबर खोदा .-”

संताजी : [रडवेल आवाजात.] “पण राजे तुम्हांला सोडून.”

संभाजी राजे : “अरे, कशाला फिकीर करता आमच्या प्राणाची?” “आईच्या स्तनाला लुसणाऱ्या बाळाला त्याच्या माते पासून दूर करणं जितकं अवघड, तितकचं सह्याद्रीच्या मांडीवर खेळणाऱ्या या शिवपुत्र संभाजीला दूर कोणी ओढून नेणं महाअवघड! जा पुढ. अगदी निर्धास्त जा!” [सर्वजण निघतात.]

[संभाजी राजे, कवी कलश सर देसायांच्या वाड्यात आश्रय घेतात वेश बदलत असतानाच.]

कवी कलश : [हाता-पायाला डोक्याला रक्त. वेदनेने बोलले.] “राजन, आप आगे जाईये. जीव वाचवा, राज्य वाचवा! माझी काळजी करू नका. मला इथच थांबु द्या.-”

संभाजी राजे : “नाही कविराज, ते शक्य नाही. जो दरबारात आणि स्मशानातही संगतसोबत करतो, त्यालाच खरा मित्र म्हणतात! चला काळजी करू नका. आम्हीं आहोत आपल्या बरोबर!” [तेवढ्यात राजांच्या कानावर घोड्याचा अशुभ खिंकाळत एकू आली. त्यांनी राज्यांना धोक्याचा ईशारा दिला. राजे सावध झाले.स्वतःला सावरत तलवार हातात घेत.] कविराज वैरी आला.”

कवी कलश : [राजांचे पाय पकडले.] “राजन तुम्हीं निघा. नाही तर कैद व्हाल. काहीपण करा पण निघा..

[निघतात तोपर्यंत मुखर्ब खान व त्याचा मुलगा इकलास खान, घाबरलेल्या अवस्थेत गणोजी शिर्के मागून सर्व पाहत असतो. दोन हजार फौज घेऊन राजांसमोर येतो. राजे गरगर तलवार फिरवतात समोर येईल त्या गनिमांना सपासप कापतात कवी कलश पण लढत असतात. कोणीही राजांना पकडण्याची हिम्मत करत नाही हे पाहून राजांचा लक्ष चुकवून पाठीं मागून मुखार्ब खान दोरखंड टाकून राजांना जेरबंध करतो. गणोजी आनदाने मोठ मोठ्याने हसत हसत पुढे येतो. गनिमांची फौज आनंदाने “अल्ला हो अकबर ..” आरोळ्या ठोकत होती.]

संभाजी राजे : [गणोजीला उद्देशून रागाने] स्वत:च्या स्वार्थासाठी स्वराज्याचा घात आणि स्वकीयाचे रक्त पिणाऱ्या कुत्र्याची औलाद आहेस तू! नालायक हराम जादा, स्वराज्यात राहण्याची लायकी नाही तुझी!" "हा शिवपुत्र संभाजी थुंकतो तुझ्या जिंदगीवर."

मुखर्ब खान : "गणोजी पागल..हशीखुषी साजरी करायचा हा वखत नाही! आगेका रस्ता दिखाईये." कुछभी करो देर रात तक हमे कऱ्हाड का हमारा मोगली तळ गाठायचा आहे."

गणोजी : [हसत हसत] "फिकीर का करता मुकरबमियॉ? कऱ्हाडची वाट आमच्या शिर्कानातून जाते. या माझ्यामागं."

[लगबगीन निघून जातात. वाटेत निवळीच्या माळावर धनगरांची आठ दहा तरणीताठी पोर पिळदार मिशा, हातात घुंगुराच्या काठ्या, डोक्यावर निळया तांबड्याभडक पागोटे, अन कमरेला दोन दिवस पुरतील एवढ्या भाकऱ्या बांधलेल्या होत्या. त्यांच्याशी खोट बोलून पुढे निघतात.]

** पडदा **

# अंक ३

**[गावकऱ्याचा घोळका काहीतरी कानात कुजबूज चालू आहे हे पाहून धनगराच पोर पिऱ्या विचारतो झोऱ्या, पिऱ्या, बिराज्या प्रवेशातता..]**

गावकरी :१ला. "लय वंगाळ झालं"

२रा.: असं व्हायला नको होतं रं देवा! थोरल राज जाऊन दहा वर्ष झाली, तोवर त्याचा पोराची अशी वाट लागली! देवाण कसा घात केला."[हळहळत बोलत होते.]

पिऱ्या: [पुढे येऊन विचारतो] ,"काय पावण, एवढं कानात तोंड घालून काय बोलताय? काय झालय काय?"

गावकरी : "आपल्या शंभूराजांचा त्याच्या मेव्हण्यान घात केला रे, पोरांनो. राजांच्या बैलासारख्या मुसक्या बांधल्या. पातशहा फरफटत ओढत घेऊन गेला रे! आपल्या राजाला..! [गावकरी रडत रडत आपले पाणावलेले डोळे पुसत बोलला.] त्या नीच गणोजी शिर्क्यान शंभूराजांना दगाफटका करून पकडून दिलं. दुपारी ह्याच वाटेन गेले

सारे.''[धनगराची पोरं घाबरीघुबरी होऊन एकमेकांकडे पाहू लागली.]

बिरज्या : ''काय तरीच काय बोलताय, राव?'' त्या शिर्क्यान हिऱ्याच्या दोन सौदागरांना पकडून घेऊन शान गेलाय. आम्हांला वाटतं तो गण्या शिर्क्या भेटला व्हता. त्यांनीच आम्हांला सांगितलं हिऱ्याच्या व्यापाऱ्यांना घेऊन जातोय म्हणून.''

गावकरी [रडवेल आवाजात] ''नाही रं पोरा, आपलं राजं होतं ते.''

पिऱ्या: ''ह्या वाटेन...! म्हंजी आम्ही पाहिलेलं राजे होतं. अरे आमच्या कर्मा...[जोरदार रडतबोलू लागला व आपलं डोकं जांभळीच्या झाडच्या बुंध्यावर थाड थाड आपटले. ऐकजन आपल्या थोबाडात मारून घ्यायला सुरुवात केली. काहीजण रानात गडगडा लोळू लागले. पोरं एकमेकांच्या गळ्यात गळा घालून रडत होती. सर्व गावकरी रडत एकमेकांशी बोलत होते.]

बिरज्या : ''दादा काय करायचं आता?''[हुंदका आवरत] ''देवा मल्हारी राया, काय ह्यो घोटाळा.?''

पिऱ्या : [रागाने]''तो कुत्रा गण्या शिर्का – त्याचा सैतानी डावच आम्हांला कळला न्हाई!''

झोऱ्या : "पोरांनो, एक वेळ आपल्या आय-बा-ला भरल्या हिरीत ढकलू, पण आपल्या शंभूराजांच्या अंगाला कोणी बोटबी लावता कामा नये. त्याला बोकडावानी सोलल्याशिवाय - रहाणार नाही."

[पोरं ओक्साबोक्शी रडत आपसात बोलू लागली. पिऱ्याला विचारू लागली]

सर्वजण : "सांग दादा, आता काय करायचं?"

पिऱ्या : "गड्यांनो, काय करायचं म्हणून काय पुसता रं? जित्या लांडग्याला जबडा फाडून त्याला जीवं मारणारी आम्ही धनगराची ल्येकर! सैतान आपल्याला गुंगारा देऊन आपल्या राजाला घेऊन गेला त्या साऱ्यांची हाड तोडू. आणि त्या गण्या शिर्क्याचं मुंडक मारू."[सर्वजण चला..चला एका सुरात गरजले.]

बिरज्या : "आपण त्या गण्या शिर्क्याला आणि त्याच्या पंताला ठार मारू." [अंगात वारं शिरल्या सारखं ती सारी पोरं कराडच्या दिशेने पळू लागली. शिवाजी आणि संभाजी त्या लेकरांना जीव की प्राण होता. कळत नकळत आपण वैऱ्याला मदत केली. त्या जाणिवेन त्या पोरांची आग आग होत होती!

काहींनी संभाजी राजांचा राज्याभिषेकावेळी रायगडावर गजाचा खेळ मांडला होता. सर्वजण निघून जातात.]

[न थांबता, न थकता त्या आठ लेकरांनी रात्रभर धावत कमरेला बांधलेल्या कोयते शिवशिवत होते. हाताच्या मुठी घट्ट दाबत धावत होती. रात्र सर्वजण झोपेत रात किड्यांचा आवाज कराडचा मोगलाई तळ सर्वजण डाराडूर झोपले होते. पहारेकरी पहारा देत होते.]**

पहारेकरी : "काय रे कुठं चालला?"

पिऱ्या : "आमाला गणोजी शिर्के सरकारांनी बलीवलय जी."

पहारेकरी : "कुठून आलात."

इल्या : "आज शंभूराजांच्या शिकारीवर शिर्के सरकार आलं हुतं. त्यांना वाट दाखवण्यासाठी आम्हीच हुतो की!" [दुसरा शिपाई पाहतो ते ओळखीचे वाटतात म्हणून बोलतो.]

शिपाई : "अरे, ले जाओ उनको गणोजी के पास, वे सब हमारेही छोकरे है।"[तळावर कमालीची सामसूम होती. पहारेकरी गणोजीचा तंबू दाखवतात. त्याबरोबर ती पोरे एकदम तारस्वरात गरजली "बिरुबाच्या नावं न चांगभलं.... बिरुबाच्या नावं चांगभलं पहारेकऱ्याच्या हातातील दिवट्या झटपट करून काढून घेतल्या. आणि गणोजी

झोपलेल्या तंबूवर फेकल्या. बघताबघता तंबू जाळून खाक झाला. मुस्लीम शिपाई ओरडू लागले भागो..भागो..आग ..आग..''या अल्ला बचावो.. बचावो सगळीकडे पळापळ सुरु झाली..]

पिऱ्या, इल्या : : "गण्या शिर्क्या, ये, बाहेर ये, तुझी खांडोळी करतो."[मोठ्याने ओरडत होता. सर्व अटक होतात.]

** पडदा**

***[मुखरब खानची छावणी दुसऱ्या दिवशी मुखरब खान, गणोजी समोर सर्वांना हजर करतात.]****

शिपाई : "हुजूर..यांनीच गणोजी आणि नागोजीच्या तंबूला आग लावली. याचं काय करायचं."

मुखरब खान : "हां मैं पहचानता हूँ. इन बच्चोको. यांनीच आम्हांला वाट दाखवली. यांनीच आम्हांला रोटी दिली.[थोडावेळ विचार करून.] "छोड दो, जंगल के पंछी है, जंगलकी तरफ जायेंगे." [जेरबंद पोर मुक्त झाली. थोडं चालून पुढे जातात. तसा दबक्या आवाजात पिऱ्या गुरगुरला,]

पिऱ्या : “लेकाणु या खानान आम्हांला मोकळ केलं, पण आमच्या राजाला नाही.[सर्व एकमेकांकडे पाहतात मागे वळतात मोठ्यान ओरडतात यळकोट यळकोट..जय मल्हार.. आणि खानाच्या आणि गनोजीचे गळे पकडतात. हे पाहून शिपाई सर्वांवर सपासप वर करतात. सर्वजण ठार होतात. मुखारब खान आणि गणोजी खूप घाबरतात थरथर कापत असतात.]

मुखरब खान : [रागाने.] “फेकून द्या या मुडद्याना कोयना नदीमध्ये.”

गणोजी : “बघितलात खान साहेब, या संभाजीसाठी ही माणस कधीही मारायला तयार आहेत. आमचं काम झालं आता आम्ही सुरक्षीत ठिकाणी जातो. नाहीतर आमचा जीव जायचा.”

मुखरब खान : चिंता करू नका, गणोजी! पातशहा तुम्हांला जागीर जडजवाहीर देऊन मालामाल करून सोडेन.”

गणोजी : “पुढचं पुढे बघू, खान साहेब, आता आमची जबाबदारी संपली! आता आम्ही इथं थांबन म्हणजे मृत्यूला बोलावण. खांसाहेब.”

मुखरब खान : “ठीक आहे.” [चला मग आपण निघून जातात.]

*[औरंगजेबाची छावणी इकडे तिकडे फिरत असतो. संभाजी अटक झाल्याची बातमी अजून पातशहाला माहीत नसते.]*

औरंगजेब : संभाजी ... संभाजी ... संभाजी... निंद हराम करदी उन्होने ! कहा है वह दख्खन का चुहा!" [तेवढ्यात शिपाई येतो.]

शिपाई : "हुजूर...हुजूर..बडी खुशीकी खबर है। संभा गिरफदार हुआ!"

[बहादूरगडच्या लष्करी तळावर बातमी संभाजी जिवंत सापडला.]

औरंगजेब : "क्या बक्ते हो..पिके तो नाही आये,"

शिपाई :"ना हुजूर संभा गिरफ्तार हुआ! मुखर्बखानने संगमेश्वर मे दस्त कर लिया उन्हे,"

औरंगजेब : [खुषीने.] "अल्ला ताला की मेहरबानी, शब्बी रात का जस्न होना चाहिये, आखिर दख्खन का चुहा आया हमारे सिकजे मे, अब दिखायेगे उसे, लेआवो उसे शानो शोकत से, पेश करो उसे हमारे सामने."

[दरबारात औरंगजेब समोर साखल दंडाने बांधून राजांना सादर केले जातात. राजाच्या आजूबाजूला दहा बारा हत्यार बंध सैनिक असतात. संभाजी राजे समोर येताच औरंगजेब तक्ता वरून उठून

गुड्ग्यावर बसतो. अल्ल्लाचे आभार मानतो. मुखर्ब खान राजना घेऊन दरबारात हजार होतात दहा बारा सैनिक बरोबर असतात]

फौलाद खान : “झुक जाव आलमगीर सामने!”

कवी कलश : [खड्याआवाजात] “झुकेंगे नही, राजा है वो!”....

मुखर्ब खान : “खामोश!”

औरंगजेब : “चूप...चूप सबूर सबूर... बहुत कुच्छ पुछना है! इसे.”..

औरंगजेब : “या अल्ला, परवरदिगा..!” [गुडगे टेकून खाली बसतो या अल्ला...]

संभाजी राजे : “तक्तही भुला, ताजाही भुला, उतर पडा अवरंग
शेर को देखा बकरी के, अब उड गये सारे रंग”

[चिडवत बोलतात.] “कवी आहात आपण, या समयी सुचते का, एखादी कविता?”

औरंगजेब : “हा, राजन!..क्यू नही.”.

“राजन तुम हो सांझे, खूब लढे हो जंग
देखते तुम्हारा तेज, तक्त तेज अवरंग”

संभाजी राजे : “बहोत खूब!”

औरंगजेब : “खामोश! जहन्नमी!” ‘९ बरस का था, उस वक्त ये मिलाथा मुझे आग्रा मे, कभी कभी ठडक नाही दिया काफर ने! ...क्यू संभा डर नाही लगता मेरा!”

संभाजी राजे : “हमे किसिका डर नाही लगता, लेकीन हमारे वजहसे डर लगता है सबको.”.

औरंगजेब : “खामोश! मै जो पुचता हु सिर्फ उसका जबाब दो . कहा रखा है. खजाना, कहा रखी है लुट!”

संभाजी राजे : “हिंदुस्तान आमचा खजाना, इथली माती आमचा सोन, औरंगजेब तू लुटलास इथला खजाना, तुझ्या सारखी मागणार नाही भिक, होणार नाही भिकारी, हिंदुस्तान हाक मारून भिक देतो तुझ्या सारख्याला, घेत नाही असा, अरे घेऊ तलवारीच्या बळावर, मनगटाच्या जोरावर, शिव छात्रपतींचे पुत्र आम्ही.”..

[औरंगजेब चकीत होऊन पाहत राहिला]

औरंगजेब : “काही संयम है. यह मरहट्टे, यह मरहट्टे क्या खिलाते है. अपने बच्चोंको क्यो पैदा नाही हुआ, एक भी शक्स हमारे जनाने में!” .......

संभाजी राजे : “औरंगजेब, तुझ्या सारख्या नादानाच्या पोटी संभाजी कसा जन्माला येईल. तो येईल छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोटी आणि महाराष्ट्राच्या मातीत.”

औरंगजेब : “खामोश!” बता संभा... बता .. कौन.. कौन.. सरदार शामिल थे तुम्हे हमारे”

संभाजी राजे : “तक्तासाठी रक्तावर उलटणारी जात नाही आमची. माती इनाम आमचं ! आई भवानीचे भुते आम्ही ! याद रख, महाराष्ट्राच्या मातीत उभा आहेस तू! इथच माती करू तुझी, आमच्याच वाटेवर येऊन वाटमारी करणाऱ्यांची त्यांच्या वाटेवर जाऊन वाट लावल्याशिवाय राहणार नाही असा इतिहासच आहे आमचा.”

(औरंगाबजेब थक्क होऊन राजांकडे पाहत राहिला. संभाजी आपल्याला काही ऐकत नाही हे पाहून हुल्लाखानाला जवळ बोलावून कानात काहीतर सांगू लागला आणि ताडकन निघून गेला. )

{ तुरुंगाचा पडदा }

रुहुल्लाखान : [जवळ जाऊन.] “अजून वखत बाकी है संभा, तुझी उमर ती किती? फक्त बत्तीस! आमच्या पातशाची मर्जी सांभाळशील, तर अजून आपली प्यारी जिंदगी बचावशील सुन ले!”

कवी कलश : “करून करून काय करणार रे तुझा तो हलकट पातशहा?” [दरडावून.]

रुहुल्लाखान : “पागल मत बनो, ह्या बंदिखान्यात भुके कुत्ते सोडले जातील. ते तुमच्या रक्तमांसाचे लक्तरं करतील.”

कवी कलश : "म्हणजे आपल्या मदतीला पातशहा आपल्या भावानाच बोलावणार तर!" रुहुल्लाखान साहेब आव इधर आव."

[कवींच्या या बोलण्यावर संभाजी राजांना हसू आवरेना ते हसू लागले. कवींनी रुहुल्लाखानाला काहीतरी सांगण्याच्या बहाण्याने जवळ बोलावले आणि त्याच्या तोंडावर पचकन थुंकले. खानाने रागाने कमरेचा जांबिया काढला पण राग आवरला. कैदी काहीच खर सांगत नाहीत शिव्या देतात हे पाहून बदलत्या स्वरात संभाजीकडे वळून.]

रुहुल्लाखान : "संभा, बेटे तुझ्या वयाचे दोन बच्चे आहेत माझे, त्यांची कसम खाऊन सांगतो, कशासाठी सोन्यासारखी जिंदगीचं वाटोळं करतोस?"

संभाजी राजे : "खान साहेब, तुमच्या पातशहाची आम्हांला खूप दया येते."

रुहुल्लाखान : "क्यू.?"

संभाजी राजे : "एखाद्या लुंग्या कुत्र्याला हिऱ्यामाणकांचे हार घातले आणि अंगावर सोन्याची झूल टाकली, तरी तो सिंहासनावर जाऊन पोचणार मात्र आपल्या धनीच्या पायांनी!"

रुहुल्लाखान : “तोबा..तोबा..संभा - कैसी बाते करते हो? आलमपन्हाँ की बराबरी कुत्ते के साथ?”

संभाजी राजे : “हो.. कुत्र्यालासुद्धा एक दर्जा असतो. तुझ्या पातशहापेक्षा ते गरीब जनावर कितीतरी नेक आणि वफादार आसतं!”[रुहुल्लाखानाला घाम फुटतो घाम फुसत पाय आपटीत निघून जातो. दुसऱ्या बाजूने अंधाऱ्या रात्रीचा फायदा घेत राजांनवर प्रेम करणार मियॅाखान येतो. राजांची अवस्था पाहून त्याला खूप वाईट वाटले. शंभूराजांची पाय धरून तो रडू लागला. राजांनी त्याच्या डोक्यावर हात फिरवत.] “बंधू, मियॅाखान!”

मियॅाखान : “राजे, काय वाट्टेल ते करून तुमच्या ह्या बांध्या सेवकानं तुम्हांला बहादूरगडाच्या पोलादी कुसाबाहेर काढलं असतं. पण.”

संभाजी राजे : “मियॅाखान!”

मियॅाखान : “होय, शंभूराजे! इथून बाहेर पडण्याची कसोटी नाही. पण ह्या भुईकोटाच्या चारो तरफ शंभरभर कोसांपर्यंत फक्त मोगलांचाच अमल आहे. जुलमी पातशाहाने कोणाही मराठ्याच्या पागेत घोडा ठेऊ दिलेला नाही. तरण्या पोरांना

गावागावांतून झोडपून काढलं आहे. अनेकांना पळवून लावलय. सर्व मुलुख दुश्मनांच्या कब्जात आहे.”

संभाजी राजे : “जाऊदे खानसाहेब! जिंदगीच एवढं काय? काही माणसांच्या जन्मवेळाच अशा चमत्कारिक असतात म्हणून सांगू. अशी माणसं जगण्यापेक्षा आपल्या मरणानेच मोठी होतात! त्यासाठी जगदंबेनं आमची निवड केली आहे त्यात दोष तरी कोणाला देणार?”

मियॉखान : “राजं, देवाप्पान दिलंय चिठ्ठी हाय.” [राजनचा मित्र देवाप्पा महार यांनी रायगडावरून येसू महाराणीने दिलेली चिठ्ठी असे सांगत कमरेची चिठ्ठी काढतो आणि राजांना देतो. आपल्या लाडक्या राणीनी दिलेली चिठ्ठी वाचातान राजांचे डोळे भरून आले.]

संभाजी राजे : “मित्रा मियॉ, आमच्या राणी साहेबांना एवढाच निरोप पोचवा. अशाच हिंमतीन उभ्या राहा. आमच्याकडून पुढील ईषारा येई पर्यंत सह्य पर्वताच्या अंगाखांद्यावरचे आपले अजिंक्य, बेलगाम किल्ले कोणत्याही परिस्थितीत गमावू नका. “आमच्या काळजीन आपण पोखरून गेले असाल. मात्र आमची काळजी करू नका. आमच्या आबासाहेबांनी या महाराष्टाच्या भाळावर

हिंदवी स्वराज्याचं गोंदण गोंदलेले आहे. त्यासाठी अनेक वीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. हे हिंदवी स्वराज्याचं गोंदण अबाधित राखण्यासाठी महाराणी प्रसंगी आपल्या कपाळाच कुंकू पुसायची तयारी ठेवा! कोणत्याही परिस्थितीत गडदुर्गाचे ताबे दुश्मनाला मिळू देवू नका.”

मियॉखान : “राजं, केव्हड मोठ हृदय तुमचं! केव्हड प्रेम तुमच्या रयतेवर!” राजं दुश्मनी गोटातून एक बातमी हाय. दुर्गा राणीसाहेब, आपली राजकन्या कमलजा आणि राणूआक्का यांना पातशहा आपल्या भेटीला पाठवणार आहे. राजं, [इकडे तिकडे पाहत] खूप वखत झाला. दुश्मन येईल निघतो मी.”.

संभाजी राजे : “ठीक आहे मियॉ, आम्हीं आपले उपकार कधीच विसरू शकणार नाही.” [मियॉखान धीम्या पावलांनी इकडे तिकडे पाहत निघून जातो.] [कवीला उद्देशून] कविराज [हसत हसत कवी राजांकडे पाहतात.] औरंगजेबाची पुढील चाल पहा; बंदिखान्यातील आमच्या पत्नी दुर्गा आमची कन्या कमलजा आणि बहिण राणूआक्का यांची १० वर्षानंतर भेट घालतो आहे पातशहाला वाटतं

कदाचित संभाजी बदलेल आणि आपले काम पूर्ण होईल. पण...बदलतील तर ते शिवपुत्र संभाजी कसले.[संभाजी बसलेले असतात त्यांच्या कानावर पडद्या मागून हाक “शंभू.. बाळराजा.... बाळराजा ...! एकू येते ते धाडकन उठून उभे राहतात. खूप वर्षांनी गोड शब्द कानावर पडतात. पुढे जाऊन राणूआक्का मिठी मारतात पत्नी दुर्गा मुलगी कमलजा मिठी मारून धाय मोकलून रडू लागल्या. राजे अश्रुंनी ओलेचिंब भिजून गेले होते. सर्वांना हुंदके आवरत नव्हते. स्वतःला सावरत राजे.]

संभाजी राजे : “राणूआक्का, किती दुर्दैवी काळ हा? या दुर्दैवानं आम्हांला कोठून कोठे फिरवून आणलं? नाही तर आक्कासाहेब, ह्या औरंग्याची कातडी सोलून भुस्सा भरून त्याचं मांस घारी गीधाड्याना टाकायचे आणि माणसांना देवादिकांना मुक्त करायचा विचार होता आमचा.”

राणूआक्का : [रडत] “शंभूराजे, काय बोलाव तेच समजत नाही! मनात वाटत होतं. एकना एक दिवस हा दुष्टकाळ संपेल आणि एक दिवस आम्हीं रायगडावर येऊन सुवर्णसिंहासनावर बसलेल्या आमच्या बंधुराजांना डोळे भरून पाहू!”

संभाजी राजे : [हळू रडवेल स्वरात.] “माफ करा आक्कासाहेब आणि दुर्गाराणी साहेब आम्ही आपणासाठी काहीच करू शकलो नाही.”

राणूआक्का : “असं बोलू नका राजे, खूप खूप लडलात आपण अगदी भरलेल्या मेघा सारखं कोसळून पडलात विजांच्या कडकडात त्या पापी औरंग्यावर!” [राजांच्या डोक्यावर केसावर हात फिरवत समजुतीने...] “राजे, हेही दिवस जातील, शांत रहा.”

संभाजी राजे : “आक्कासाहेब, काळानं असे कठोर तडाखे आमच्यावर का मारावेत?” आमच्या या लेकीला आम्हीं याआधी कधीच भेटलो नाही.[कमळजाला मिठी मारून दुर्गाचा हात धरून.] “दुर्गा, एक स्त्री म्हणून, एक पत्नी नव्हे, तर एक मानवी जीव म्हणून सुद्धा तुम्हांला आम्ही कोणतंच सुख देऊ शकलो नाही.”

दुर्गा : “शंभूराजांची पत्नी आणि शिवरायांची सून या दोन शब्दांचा लोकांकडून मिळणारा गोडवा स्वर्गसुखापेक्षा काय कमी प्रतीचा आहे.”

[तेवढ्यात बाहेरून आवाज आला.”जल्दी करो आप सबको वखत बहुत थोडा है..”]

राणूआक्का : [रागाने] “काय काय हवं आहे त्या राक्षसाला?”

संभाजी राजे : “पातशहानं अनेकदा निरोप धाडला आहे. तुमच्या सकट आम्हांलाही जीवदान द्यायला तयार आहे तो.”

राणूआक्का : “पण; कशाच्या बदल्यात? [दुर्गा व रानुने एकदम विचारले.]

संभाजी राजे : “आम्हीं आपल्या स्वराज्यातले सर्व महत्वाचे किल्ले, दुर्ग यांच्या किल्लेदाराना इथं बोलावून घ्यायचं. सर्व किल्ले, दुर्ग यांच्या चाव्या आणि ताबे पातशहा अंमलदारांकडे सोपवायचे. आणि आपला हा मुलुख, ही माती सोडून दूर निघून जायचं! हिंदुस्थानच्या दुसऱ्या कोणत्याही भागात, पातशहा आम्हांला खास जहागीर द्यायला तयार आहे.”

दुर्गा : [ओरडल्या] “नाही! नाही! अजिबात नाही! स्वत:चा प्राण गेला, तरी एकही किल्ला खाली करू नका. राजे.”

राणूआक्का : “आपल्या आबासाहेबांच्या वचनापासून बिलकूल फारकत घेऊ नका.”

संभाजी राजे : [उदासपणे हसत बोलत.] “दुर्गाराणी, पातशहाच्या मेहरबानीन किती दिर्घकालान भेटतो आहोत आपण.

त्याची अशीच मर्जी राखली तर आपली सुटका होईल. सधवा म्हणून उरलेलं आयुष्य काढाल तुम्ही.”

दुर्गा : [जोराचा हुंदका फुटला. शंभूराजांना हात जोडत कळवळून रडत म्हणाल्या.] “नका राजे.. थट्टेतही असं बोलू नका. आमच्या मामंजीसाहेबांच्या- ध्येयस्वप्नपूर्तीपुढं सधवेपणाची काय तमा. आम्हीं आमचं उरलेलं आयुष्य कसही काढू.”

राणूआक्का : “खरं आहे शंभूबाळ! आमचे प्राण वाचो व जावोत, पण आमच्या प्राणांच्या मोहापायी आबासाहेबांच्या इभ्रतीला धक्का पोचेल असा कोणताही कौलकरार करू नका, त्या औरंग्या बरोबर!”

[तेवढ्यात बाहेरून आवाज येतो वेळ संपलेली आहे. संभूराजे चौघानाही आपल्या मिठीत घेतात. राजे कामळजाचे मुके घेतात. कमळजा बाबा..बाबा..आकांत करते डोळयातून अश्रूच्या धरा...त्या तिघीही न सोडवत एकमेकांन पासून हळूहळू मागे सरकू लागल्या. तितक्यात बाजूच्या कोपऱ्यातून कवी कलशांची हाक आली. राणूंआक्का त्या हाके सरसी राणुआक्का झपझप पावले टाकत कवी कडे जातात. प्रेमाने जवळ करत.]

"कविबुवा...सुखात, दु:खात, बदनामीमध्ये आणि आता मरणाच्या दारात सुद्धा आमच्या शंभूबाळाची सांगतं केलात. कविराज पुढच्या जन्मी आमच्या शंभूबाळाचे मित्र नव्हे; तर आमचे सख्खे बंधू म्हणून जन्माला या."

[शंभूराजे व कविबुवा राणूआक्का, दुर्गा, कमळजा यांच्या पावलांचे दर्शन घेतात कविबुवांचा कंठ दाटून येतो आणि म्हणतात.]

कवी कलश : "दुर्गाभाभी..राणुआक्का.. या मातीसाठी, हिंदवी स्वराज्यासाठी सह्याद्रीच्या कडेकपारीतून दऱ्याखोऱ्यातून अजून औरंग्याशी जंग करणाऱ्या आमच्या साथीदारांना ह्या कलशाचा कोणाकडून तरी सांगावा धडा.

"फॉसी की फॉस गले से लगाया

चले हम मौज की चाल सदही

जानि परै अजहूँ पग के तल

लोहे की किल सतेज गडाही

लोभ नाही जिनगी का कभी था पै होती जो हाथ खड्ग दुधारी

साथ तुम्हारे महारण में लडता नितही बन वीर जुझारी "

{ अर्थ: मस्तीत चाललो फाशीच्या फांदावरुनी

तळपायामाजी खिळे अजुनी कुरकुरतात

गड्यांनो जिंदगीचा लोभ कधी नव्हता आम्हां
परी अजून हवी होती तेग हातात
जंगमैदान जागवित अजुनी झुंजलो असतो
तुमच्या सहवासात!”}

***[पडदा पडतो.]****

[बंदिखाण्यात बंदोबस्ताचे वरपांगी नाटक करत औरंगजेब त्या दोघांच्या जवळ येतो. संभाजी राजांकडे गुश्शात पाहत तिरस्काराने बोलला.]

औरंगजेब : “संभा..तीस वर्ष झाली असतील या गोष्टीला. माझ्या सग्या भावाची, शहजादा दाराची अशीच मरतुकड्या हत्तीवरून धिंड काढली होती, मी दिल्लीच्या रस्त्यातून. तेव्हा त्या बेवकूफ इसमाच्या बेइज्जतीवर खुषीने खूप हसलो होतो.”

कवी कलश : “पातशहा ..तूच बेवकूफ आहेस. दारा एक भला, नेक आदमी होता. हिंदू आणि मुसलमान दोघांचाही प्यारा शहजादा.”

औरंगजेब : “पागल शायर, तू अपने जबान पर ताबा रख नाही तो. तुम्हारी ये जबान मुझे जडसे उखडणे होगी.” [कडाडल.]

संभाजी राजे : [हसत] “केवळ घातपात! बेवकूफ पातशहा, अशा घातपातातून, रडीच्या डावातून पैदा केलेल्या गोष्टीला तू फत्तेह मानत असशील, तर तू गद्दरांचाच शहेनशहा ठरशील! हिंदुस्तानचा नव्हे.”

औरंगजेब : “ये रग, ये मस्ती-?” [रागाने]

संभाजी राजे : “का नाही, तुला हिंमत असेल तर आमच्या अंगावरच्या तोडून दाखव ह्या बेड्या, आणि काढ मैदानात बाहेर तुझा कोणी सिपह्सालार, शहजादा, नाहीतर पोता. होऊन जाऊदे आमने सामने जंग, मग बघ ह्या शिवपुत्र संभाजीच्या हातात नाचणारी तेगच तुझ्या सवालाचा जबाब देईल!” [थोडावेळ शांत राहून ..पुढे नेटाने बोलतो.]

औरंगजेब : “संभा, तुझ्या धिंडीच्यावेळी काय कमी दुनिया देखलीस? तेव्हा कोण आले तुझ्या मदतीला? बेवकूफ राजा! अपनी प्यारी जिंदगी बचा. आम्हांला आपले मान!”[संभाजी वाठारलेल्या डोळ्यांनी नजर गरगर फिरवत.]

संभाजी राजे : “ती नादान धिंड काढून आपण आमचा किती सन्मान केलास हे साऱ्या जगाला चांगलं ठाऊक झालं आहे.”

[काही केल्या संभाजी शरण येत नाही म्हणून आपल्या लाघवी भाषेत संभाजी राजांवर मोहिनी टाकायचा प्रयत्न.]

औरंगजेब : “संभा तुझ्या बापाचा त्या शिवाचा मला नेहमी हेवा वाटतो. [संभाजी बिथरल्या नजरेने औरंगजेबाकडे पाहतो.] “एका जंगली चुव्याने, मामुली जमीनदाराने, मराठ्यांची सल्तनत उभी करावी, ही बाब किती बहादुरीची!””

संभाजी राजे : “पातशहा..माझ्या पित्याची दौलत म्हणजे कोणा घमेंडखोर सुलतानाची राजगादी नव्हती. ते गोरगरिबांचं स्वराज्याचं स्वप्न होतं!”

औरंगजेब : [भारावलेल्या स्वरात.] “कितना खुशकिस्कमत तो शिवा, तुझ्यासारख्या होनहार बच्चाला जन्म दिला. तुझा खूप नाझ वाटतो आम्हांला! आदमी अनुभवान शहाणा होतो. ठेच लागल्यावर सावध होतो. तू तर आठ वर्ष मला पाच लाखाची फौज, हजारो सरदार असूनही गरगर

फिरवलंस. माझ्या जिंदगीतील हा सर्वात मोठा अनुभव मी खुल्या दिलानं कबुली देतो शह्जादे, ही तारीफ नव्हे; हकीकत आहे. आपल्या बापानंतर मराठ्यांच्या गादीसाठी तू जसा आमच्याशी आठ सालांचा कडा मुकाबला केलास, किल्ले झुंजत ठेवलास, दर्याचे पाणी पेटवलस, तशी जरी थोडीफार हैसियत माझ्या चार शह्जाद्यापैकी कोणा एकमध्ये असती तर?"

संभाजी राजे : [मोठा स्वास घेतला औरंगजेबाच्या नजरेला बेजकर नजर लावत.] "अवरंगशहा अशी वरपांगी तारीफ करण्याऐवजी तुला काय हवं, ते साफ दिलानं सांगून मोकळा हहो."

औरंगजेब : "तुझा अव्वल खजाना कुठं आहे?

संभाजी राजे : "गडा – गडावर." [करारी आवाजात]

औरंगजेब : "आमच्या फौजेतील कोण कोण शैतान तुला सामील आहेत?"

संभाजी राजे : "माहीत नाही." [करारी आवाजात]

औरंगजेब : [कंटाळून मोठ्या आवाजात] "घमंडी संभा, अजून होशमध्ये ये. एका बेवकूफ शायराच्या नादी लागून नादान बनू नकोस. तुला अंदाज नाही. अभीतक आमच्या

चाळीस हजार फौजा तुझ्या मुलखात घुसल्या असतील. त्यांनी रायगडला वेढाही घातला आहे.”

संभाजी राजे : “बेवकूफ पातशहा, आमचा रायगड ठिसूळ मातीचा बनलेला नाही.”

औरंगजेब : “पोलादाचा असला तरी पिघलवून टाका, असा हुकुम आहे आमचा.”

संभाजी राजे : “पत्थराचा आहे म्हणून सांगतो – तो दुभंगनारसुद्धा नाही.”

औरंगजेब : “काफरबच्चा, आमच्या साऱ्या फौजा तुझ्या मुलखात धुडगूस घालत आहेत. तुझ्या मुलखातील सारे वतनदार आम्हांला सामील झाले आहेत.” “संभा, तुझ्याकडून मला फक्त दोनच गोष्टी हव्यात. एक फितुरांची फेरिस्त आणि सह्याद्रीतल्या सर्व बळकट किल्ल्यांच्या चाव्या, ताब्यांसह!”

संभाजी राजे :[पातशहाच्या बोलण्यावर राजांना हसू फुटते खिल्ली उडव.] “मूर्ख पातशहा, अरे सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरचे आमचे बळकट किल्ले ही तर आमची शोभा, सामर्थ्य आणि गंडस्थळ! या शिवपुत्र सभाजीकडे काहीही मागायची बेवकूफी करतोस? उद्या तू ईदच्या चांदकड

जोगवा मागशील, अस्मानातील साऱ्या चांदण्याचा वेल खुडून दे म्हणून! आहे का ते मुमकीन?" [कोपऱ्यातून कवी कलश पातशहाच्या मूर्खपणावर हसत होता. त्याच्याकडून चाललेली आपली कुचेष्टा, उपमर्द, उपहास पाहून तो आणखीनच बिथरला.]

औरंगजेब : [कविकडे पाहून.] "चूप पागल शायर." "संभा तू एका गोष्टीचा विसर पडू देऊ नाकीस. माझ्याकडे दयामाया, प्यार मोहब्बत अशा झुठया जळवा आम्ही आमच्या कलेजात कधीच चिकटून घेत नाही. उघड्या सत्याचे पुजारी आहोत आम्ही. तुझ्याशी वादा करतो, तुझ्या साऱ्या बड्या किल्ल्यांचा ताबा तू माझ्या अंमलदारांच्या कबजात दे. आणि तुझ्या या दोस्तासकट कोणत्याही मुलखात निघून जा."

कवी कलश : [खदखदून हसत.] "वा.. बेवकूफ पातशहा!"

औरंगजेब : "ये मजाक नाही है बेवकूफ शायर! हवं तर कुराणे शरीफवर हात ठेवून आम्ही तुम्हांला वचन देतो."

संभाजी राजे :[पातशहाकडे पाहत शंभूराजे छद्मीपणे हसले.] "आमच्या गड्दुर्गांच्या चाव्या हासिल करण्यासाठी तू

खूपच बेताल दिसतोस पातशहा! न लढता, सरळ किल्ल्यांचा ताबा तुझ्याकडे द्यायचा म्हणतोस?"

औरंगजेब : "बिलकूल."

संभाजी राजे : "अरे, आमचा एक रामसेज घ्यायला तुला साडे सहा वर्षे लागली. आमचे साडे तीनशे किल्ले घेण्यासाठी तुला किती जन्म घ्यावे लागतील याचा विचार कर." आम्ही मराठे किल्ल्यावरील प्रत्येक दगडाला आपल्या गरम रक्ताचा शेंदूर पहिल्यांदा फसतो आणि त्याचं रक्षण करता करता जळून खाक होतो." तुझ्या सारख्या ऐतखाऊ अवलादिना किल्ल्याच्या चाव्या मिळतातचं, पण नक्षत्रासारख्या आपल्या बहुबेटीनचे हात दुश्मनांच्या हवाली करून दौलती बचावनाऱ्याच्या अवलादी तिकडे राहतात. या महाराष्ट्रात नाही."[औरंगजेब रागाने लाल बुंद होतो. इकडे तिकडे पाहतो दोन्ही हातच्या मुठी आवलतो. खूप त्रासाने मान हलवतो पडदा पडतो.]

** पडदा **

[पातशाहाला झोप लागत नाही. बिछान्यावर बसलेला असतो. एका रात्री शिपायाला हुकुम देतो.]

औरंगजेब : “रुहुल्लाखान को बुलावो.”

रुहुल्लाखान : [खान येतो मुजरा करत.] “हुकुम मेरे आका.”

औरंगजेब : “वो नादान शायर को लेके आ.” [खान मुजरा करून जातो. कवी कलशांना घेऊन येतो. कवींना औरंग्याची चाल लक्षात येते. समोर आल्या नंतर कवी मोठ मोठ्याने हसतात. औरंगजेब चाकीन होऊन बघतो.]

कवी कलश : “लो..एक बेवकूफ पातशहा एक नादान शायरसे सौदा करनेके लिए खुद चला आया.”

औरंगजेब : [हसत हसत.] “बोलो.. कविराज क्या चाहते हो?”

कवी कलश : [मनमुराद हसत.] “शायर आणि कवींच्या मेंदूत मस्तीचा बारूद भरलेला असतो शहेनशहा! आमच्या दुनियेत सिंहासनाला कवडीइतकही स्थान नसतं. आमचा कैफ, आमची बेहोषी आणि आमची बेखुदी म्हणजे आमचं सिंहासन.”

औरंगजेब : [उपहासाने हसत हसत.] “पागलखाण्याच्या फटीतून जे लोक बाहेर पळून जातात, त्यांनाच दुनिया शायर म्हणून ओळखते! तुही एक नादान शायर आहेस, बसं.”

कवी कलश : “बिलकूल.”

औरंगजेब : “म्हणूनच तुला जागीर, हिरेजवारात अशी कसलीही चाहत असणार नाही.”

कवी कलश : “जी हाँ, अंगावर लाज झाकण्याइतका लिबास आणि शंभूराजांसारखा दोस्तचा नव्हे फरिश्ताचा सहवास लाभला माझ्यासारख्याला आजून काय हवं?”

औरंगजेब : [भयंकर संतापाने.] “अरे तू तर कनोजचा बम्मन, स्वत:चं पोट भरण्यासाठी दारोदारी भटकणारा. देवा धर्माचे ढोंग रचणारा. गंगेकाठी तीर्थासाठी आलेल्या यात्र्येकरूंना दौलतीच्या लालचेने लुटणारा.”

कवी कलश : “तुला काय म्हणायचं ते म्हन.”

औरंगजेब : “तुही एक कनोजचा बम्मन आहेस भुका प्यासा बम्मन!”

औरंगजेब : [हसत हळू आवाजात लाडीगोडी लावत.] “तुझ्याकडे आमचं छोटसं काम आहे. त्या संभ्याचा तू मुख्य दिवाण, वाजीरे आझम म्हणून तुला सारे मरहट्टे ओळखतात. त्या संभ्यासह तू गिरफ्तार झाला आहेस. ही खबर चारो तरफ केव्हाच फैलावली आहे. अभी बसं, आपको इतनाही करणा है-”

कवी कलश : “काय?”

औरंगजेब : “तुझ्या स्वत:च्या सही शिक्क्याने मराठ्यांच्या प्रत्येक किल्लेदाराला एक हुकूमनामा धडायचा. संभाजीनं आपला जीव वाचवण्यासाठी औरंगजेबाशी सौदा केला आहे, असं दडपून सांगायचं. ‘उसके मुताबिक किल्ले खाली करा. मोगलांच्या ताब्यात द्या. असा हुक्म कळवायला मला – म्हणजे तुला कवी कलशला संभाने सागितलं आहे, असा झुटा कांगावा करायचा.”

कवी कलश : [हसत] “खोटे हुकुम? शंभूराजांच्या नावे, खोटे हुकुम?”

औरंगजेब : “हां! क्यूं नही? कंबख्त शायर’ ह्या छोट्याशा शाही सेवेबद्दल तुला माला माल करू. बोलो..कौनसी जागीर चाहिए तुझे?” – बरेली, ससाराम, कानपूर या आग्रा?”

कवी कलश : [पातशहाच्या नजरेला आपली नजर जाळत.] “पातशहा सलामत आपण खूप कमीने आहात, हे तुमच्या शाजाद्या अकबरापासून अनेकांनी आम्हांला सांगितलं होतं. लेकीन आज तो मुझे पता चला, की आप तो दुनियाके सब कमीनोंके, मक्कारोन्के सरताज हो!”

औरंगजेब : [लाल बुंद होऊन जोरात कडाडला.] “जबान संभालके बात करो, बेवकूफ!”

कवी कलश : “अरे, स्वार्थासाठी सग्या भावांच्या पोटात आणि पाठीत खंजीर खुपसणारा बदमाष तू! आपल्या पंडित दारासारख्या हुशार भावाचं तू मुंडकं कापलंस. इतका तू हैवान! स्वत:च्या जन्मदात्याचं पाणी तोडणारा तू एक हरामजादा. यारी दोस्ताचा खरा जलवा काय असतो, हे तुझ्या सारख्या निष्ठुर हृदयाच्याला काय कळणार?”

औरंगजेब : “ठहरो, पागल! खामखाह जिंदगी गमवून बसशील-”

कवी कलश : “करून करून माझं काय वाकड करशील रे, बुढया कोल्हया?”

औरंगजेब : “पागल बम्मन – तुला फासीच्या फांद्यावर लटकवेल मी.”

कवी कलश : जुलूस आम्हीं केव्हाचं संपवलाय आणि संपला तर बेहत्तर!” [गर्वाने.]

औरंगजेब : “कोण आहे तिकडे.” [त्या सडेतोड उत्तरांनी कायलीसारखा गरम होऊन बाहेर चाबूक घेऊन उभे असलेल्या आपल्या खोजना आणि फौजींना आत बोलावले. कविराजांच्या अंगावर सपासप आसूड पडू

लागले. मस्तकावर रक्ताच्या धार लागल्या.जखमी जनावरासारखे तेथून बाहेर फरफटत ओढत असतानाच कवी कलश मोठ्याने गातात.]

“पाप कर्म करके सदा कहता बिस्मिल्लाह
ढोंग किया, टोपी सिया मिले नही अल्लाह
निज दिमाग को टॉका लो, पागल है पातशाहा!”
{ अर्थ: “पापे करुनी, तव ओठ बोलती बिस्मिल्ला
टोपी शिवतो ढोंगी, अशाने का गवसेल अल्ला
मेंदूला टाके घाला, पातशाहाच पागल झाला”}

[या ओळी कानावर पडतात तेव्हा पातशाहा बेभान होतो आपली कट्यार हाती घेत गर्जतो.]

औरंगजेब : “क्या सूर रहे हो? पहिले ह्या बेबाक शायरच्या जिभेत शेंडा उडवा. त्याची चुरचुरीत बोलणारी जीभ कापून टाका...” [कलशांच्या भोवती कट्यारी नाचू लागल्या एकाने पाय दुसऱ्यांनी मुंडी पकडून हाल हाल करण्यास सुरुवात केली.. कवीराज कोंबड्यासारखा फडफडू लागला. रक्ताचा लोळ गळत होता.]

**[पडदा]**

[तुळापुरची छावणी संभाजीला आणि कवीला मारहाण करून काहीच हाती लागत नाही. सर्वजण आपणास दुबळा, घाबरट असे समजत आहेत असा भास पातशाहाल होऊ लागला. आणि मग.]

औरंगजेब : "कोण आहे तिकडे?" [रुहुल्लाखान येतो मुजरा करून.]

रुहुल्लाखान : "जी हुजूर."

औरंगजेब : "जा..त्या पागल कवीच्या डोळयात तापती सळई फिरवून त्या कुत्त्याचे डोळे काढा!" [खोजे जातात. हुकुमाची तामिळ झाली. कवीच्या डोळयाच्या फक्त भयावह खाचा उरल्या. संभाजी राज्यांना आपल्यासमोर आणण्याचा हुकुम. संभाजींच्या पाणीदार डोळयांकडे विषारी नजरेने पाहत आपल्या सरदारांपुढे संभाजीची खिल्ली उडवत] "संभा, दोस्ताच्या डोळयांच्या खाचा बघून तरी तू शहाणा होशील असं वाटलं होतं. पण खैर"....आता तुला नवी दृष्टी देण्याचीच गरज आहे. [बाजूला तापत्या सळया होत्या औरंगजेबानी भयभीत झालेल्या मियाखानला हक मारली.] आईये, मियाँखान सामने आईये- [मियाँखान समोर येऊन लटपटत उभा

राहतो. राजांचे हात पाठी मागे बांधलेले असतात.] मियाँखान.”

मियाँखान : [वाकून मुजरा करतो] “वझीरे आझम.”

औरंगजेब : “मियाँखान, सांभाला नवी दृष्टी देण्याची नापाक कामगिरी बजावायला आम्हांला एक इमानी मनुष्याची गरज होती. आणि मियाँखानसारखा इतका वफादार इसम आमच्या लष्करात दुसरा कोणीही भेटणार नाही?”

मियाँखान : “हुजूर, ये पाप मुझसे मत करावायिये, हुजूर मत करवयिए.”

[मियाँखान पातशाच्यापुढे गयावया करू लागला. तोच पातशाहा ओरडला.]

औरंगजेब : “मियाँखान नाही म्हणत असेल, तर संभा आधी त्यालाच नवी दृष्टी द्या.”

[मियाँखान लालबुंद सळया हातात घेऊन धीम्या पावलांनी संभाजी राजांच्या दिशेने चालू लागला. संभाजीराजांच्या तेजस्वी डोळ्याकडे त्या तप्त सळया नेता नेता त्याने त्या कचकन आपल्या पोटात खुपसल्या. एकच गिल्ला उडाला. पातशाहाच्या इशाऱ्याने हशम पुढे धावले. मियाँखानच्या अंगावर तलवारीचे घाव पडू लागले. रक्तमांस संभूराजांच्या पायावर ओघळले.]

औरंगजेब : "देखते क्या हो. संभा को नई दृष्टी दो...[एक हशम पुढे झाला. रंजनातून रवी गोलाकार फिरवावी, तशा त्या तप्त, लालजर्द सळया संभूराजांच्या डोळयातून फिरल्या! चर चर आवाज झाला. संभाजींच्या तोंडातून कोणताही आवाज आला नाही किवां आरोळी आली नाही; याच दु:ख औरंगजेबाला मात्र फार झालं.]

संभाजी राजे : "बेवकूफ पातशहा, मौत आली तरी बेहत्तर! पण हा शिवपुत्र संभाजी कदापिही फसणार नाही. तुझ्या बुढ्ढया बदनमध्ये अजून खुमखुमी असेल तर अल्लाहच्या घरी जाण्याआधी या शिवपुत्र संभाजीचे किल्ले जिंकून दाखव." [संभाजीनी आव्हान दिले.]

औरंगजेब : "ते तर आम्हीं जिंकणारच आहोत, पण...कोण कोण आमचे गद्दार तुला सामील होते. ते सांग."

संभाजी राजे : "तुला हव्या असलेल्या सवालाचा जबाब आम्ही कधीच देऊ शकणार नाही."

औरंगजेब : "क्यू?"

संभाजी राजे : "आम्हीं आमच्या दुश्मनावर समोरून समशेर चालवतो अन आमच्या दोस्तांच्या पाठी मात्र शाबूत

ठेवतो, त्या त्यांना शाबासकी देण्यासाठी! गाद्दारांचे छुपे खंजीर चालवण्यासाठी नव्हे!"

[संभाजींच्या अखेरच्या जबाबापुढे औरंग्याची मुद्रा काळी ठिक्कर पडली. कोणतीही गोष्ट आपण मिळवू शकलो नाही याचं त्याला वैषम्य वाटू लागलं. झपझप पावले टाकत तो निघून गेला.]

{ पडद्या मागून बाहेरून हे सर्व वाचावे }

*[काळी रात्र सगळीकडे अंधार रातकिड्यांचा किर्रर किर्रर आवाज राजे शांत बसलेले. विचारांची चक्रे फिरत असतात. आपल्यावरचं हे मोठं आभाळ का? कोसळावं. आपण अपराधी तर नाही ना? रक्ताचीच नाती आपल्या विरुद्ध सूड घेऊन का? उठवीत. आबासाहेबांना काय वाटेल आबासाहेब मला क्षमा करतील ना? संभाजी राजांच्या नेत्रहीन डोळ्यांतून चिकट द्रव वाहू लागतो. अंगातल्या तीव्र वेदनांचा कब्जा अनंत आनंदलहरीनी घेतला. तोवर एक अद्रुश हाताचा तळवा राजांच्या भव्य भाळावरून फिरू लागला. राजांच्या गालाला चुंबनाच्या स्पर्श झाला. हा मानवी देह, त्याचा सोनचाफ्यासारखा गंध, त्या स्पर्शात अपूर्व माया – त्या भासमूर्तीच्या कवेत आपला देह झोकून देत शंभूराजे आनंदहुंदाका फोडत बोलले. शिवाजी राजे भेटल्याचा भास होतो.]*

संभाजी राजे : “आबासाहेब, आबासाहेब.. आलात अखेरच्या रात्री आपल्या शंभूबाळाला भेटायला?”

[त्या भासमुर्तीने संभाजी राजांना घट्ट मिटीत घेतलं. पाठीवरून हात फिरवत समोरून कारुण्यगर्भ आवाज आला.]

शिवाजी राजे : [शांत आवाजात] “शंभू..लेकरा, किती दुष्ट ही दैवगती!”

संभाजी राजे : “आबासाहेब, आपण?”

शिवाजी राजे : “होय, आम्हीच! शंभू बाळ.”

संभाजी राजे : [करून आवाजात] “आबासाहेब.. अखेर आपण भेटलात. आम्ही धन्य झालो. आबासाहेब.. आम्ही धन्य झालो. आबासाहेब, ह्या शंभूकडून काही गुन्हे घडले असल्यास माफ करा. मला माफ करा आबासाहेब.”

शिवाजी राजे : “लेकरा, असं बोलू तरी नकोस. घोड्याच्या पाठीवर आपलं सिंहासन लादून असा एखादाच महायोद्धा देश-धर्म – मतासाठी आठ आठ वर्ष बलाढ्य शत्रूशी जंग छेडू शकतो!” बेटा शंभू, यश अपयशाची परवा न करता अवघ्या बत्तीस वर्षाच्या उंबरठ्यावर औरांग्याशी तू दिलेली झुंज खरोखरच अद्वितीय आणि अदभूत आहे.”

संभाजी राजे : “आबासाहेब, अंगामध्ये जितकं बळ होतं, जितकी शक्ती होती, तितकी सारी आम्ही पणाला लावली होती!”.....

शिवाजी राजे : “शंभूबाळ, तुझ्या पराक्रमाला तोड नाही, हा महाराष्ट्र, इथली माती तुला आणि तुझ्या बरोबर रक्त सांडलेल्या सहस्त्र सहकाऱ्यांना कधीच विसरणार नाही.”

संभाजी राजे : “आबासाहेब, आम्ही तो बदनाम.”

शिवाजी राजे : “नको..नको..असं बोलू नकोस संभूबाळ, अशी प्रमादाची भावनाही मनात आणू नकोस. वरून आभाळातून चांदण्याच्या डोळ्यांनी गेली आठ-नऊ वर्षे सारं पाहत होतो आम्ही. [थांबून] एक खरीखुरी गोष्ट सांगू तुला, शंभू?”

संभाजी राजे : “आबासाहेब -?”

शिवाजी राजे : “ह्या जन्ममृत्युच्या दुष्ट परमेश्वरी खेळाने आमचे हात जखडले आहेत म्हणून. अन्यथा स्वर्गाच्या महादरवाज्याना ढूसण्या मारून आम्ही तेथून केव्हाच बाहेर पडलो असतो. हातात खड्ग घेऊन तुझ्या मदतीला आणि बरसलो असतो त्या औरंग्यावर त्याचा कर्दनकाळ

बनून. माझ्या महापराक्रमी लेकरा, तुझ्या मदतीला आम्ही स्वत:कधीच धावून आलो असतो!"

संभाजी राजे : "आबासाहेब, कोंडलेल्या दही दिशा- आप्तस्वकीयांचे कावेबाजाचे घातकी घावांनी अगदी भांबावून गेला होता आम्ही! काळाने हातामधले शस्त्र नेले. नेत्रही नेले."

शिवाजी राजे : "शंभूराजा! अंधकाराच्या काटेरी वाटा तुडवताना तुझ्या चर्येवर निराशेचा एखादा ओरखडाही तू कधी येऊ दिला नाहीस. आता दिलाच्या कोपऱ्यातसुद्धा अपराधाची पुसटसे कणही ठेवू नकोस. आज ना उद्या, कधी ना कधी तुझ्या कार्यापुढ सर्वांना आदरानं मस्तकं झुकवावी लागतील. आपल्या बुद्धिबळानं आणि बाहुबालनं तू पाच लाख माणसांच्या आणि चारलाख जनावरांच्या मोगली महापुरास आठ वर्ष तुंबा घातलास. दुर्दैवान त्यांच्या या रेट्यापुढ मोडून पडला असतास, तर त्या पापी औरंग्याची जीत झाली असती. आणि जिझीया काटेरी कराचे शस्त्र घेऊन आलेल्या मोगलांचा महापूर ह्या प्रदेशात फुटला असता, तर तुकोबा – रामदासाचा आणि शिवाजीचा महारष्ट्र कुठे नि किती उरला असता?"

[शंभूराजानी राजांच्या खांद्यावर मान टाकली. त्या मायेने त्यांना धन्य झाल्या सारखे वाटतं होते.]

संभाजी राजे : “आबासाहेब!”

शिवाजी राजे : “होय बाळा.” “शंभू, माझ्या बहादूर पुत्रा! औरंगजेब म्हणजे अनेक राहुकेतुना वस्त्रगाळ करून दैवानं बनवलेला एक दुष्ट क्रूरकर्मा! जगातल्या एका बलाढ्य शक्तीशी किती हिंमतीनं टक्कर दिलीस. या आधी हा महादैत्य दिल्ली किवा आग्र्याच्या राजमहालात बसायचा, त्याच्या नुसत्या निरोपाणी दक्षिणेतील राजवटी चळाचळा कापायच्या. कुतुबशाह, आदिलशाहीसारख्या हुकुमातीना त्याच्या सावलीचाही धाक वाटायचा. पोरा, असा कपटी, मदमस्त शत्रू आपला सेनासामुद्र घेऊन जेव्हा महाराष्टावर चालून आला, तेव्हा त्या दर्याच्या लाटा बघूनच एखादा जीव घेऊन दूर पळून गेला असता. पण अजिबात भांबावून न जाता, आपल्या पाठीपोटाशी सह्याद्रीच्या रांगा बांधून त्या दुष्ट काळसर्पाशी तू कडवी, दीर्घ झुंज दिलास! “शंभूराजा, जेव्हा अनेक जाणत्यांच्या तलवारी गंजून पडल्या होत्या, बुधीवंतांच्या प्रज्ञेला चळ भरला होता, मर्दांची पावले विकलांग झाली होती,

सामान्य रयत दुष्काळाच्या तडाख्यानं मोडून पडली होती, तेव्हा उरली- सुरली माणसं एकत्र बांधून, शिरावर कोसळलेले कडे दुर करत संकटांच्या गिरीकांदातून तू रस्ता खोदलास. एवढ्या मोठ्या फौजेशी, इतक्या कमी साधनांनी तू इतकी वर्षे दीर्घ झुंज देणारा महामर्द शोधण्यासाठी इतिहासाची पानं उलटीपालटी करावी लागतील. खरं सांगू शंभू, आम्हांला वाटतं – तुझा भविष्यकाळ ध्यानी धरूनच आमच्या तुकोबारायांनी केवळ तुझ्यासाठी ह्या ओळी लिहून ठेवल्या असतील.

**“पुत्र व्हावा ऐसा गुंडा**
**त्याचा तिहीं लोकी झेंडा!” .**

संभाजी राजे : “बसं, बसं! आबासाहेब, मुत्युच्या मंदिराकडे प्रवास सुरु होण्याआधी आपण भेटलात. आपल्या ह्या शब्दांनी आम्हांला इतकं तृप्त बनविल आहे की, आता माझ्या अंगावर शहस्त्र मरणांचा वर्षाव पडला तरी बेहत्तर!”

शिवाजी राजे : “शंभू, आज या शिवाजीचे काळीज तीळ तीळ तुटते ते फक्त दोन गोष्टीसाठी. आप्तस्वकीयांनीच असा दगाबाजीचा खोडा घालून तुझ्या सारख्या पराक्रमी वारुचे

पाय तोडावेत ना! दुसरं खूप खूप वाईट वाटते ते दैवगतीच्या दुष्ट खेळाबद्दल!”

संभाजी राजे : “आबासाहेब!”

शिवाजी राजे : “होय, शंभूराया! आमच्याही जिंदगीमध्ये कसोटीचे क्षण काय कमी उगवले होते? कुटील अफजलखानाच्या भेटीसाठी आम्ही पालखीतून निघालो होतो, पण भोयांच्या पावलाबरोबर मृत्यू आमच्यासवे वाटचाल करत होता. तेथून केवळ सुदैवने बचावलो. आग्र्याच्या बंदिखान्याभोवतीचा तो सहस्त्र यवनांचा भूतमेळा काय कमी थरारक होता? तेथूनही पोरा सहीसलामत सुटलो! जालनापूर जिंकून येताना संगमनेरजवळच्या जंगलात रणमस्तखानाच्या मगरमिठीतून तर बाल बाल बचावलो होतो! थोडक्यात बचावलो तर जे दुर्दैव तुझ्यावर संगमेश्वरात ओढवले, तेच आमच्यावर संगमनेरात ओढवणार होते!” [ शिवाजीराजे अडखळले.त्यांना जोराचा हुंदका दाटून आला. शंभू राजांच्या मुखाकडे पाहत पुरते हादरून गेले होते. शंभूचे जखमी शिर आपल्या छतीशी कवटाळून ते उदगारले.] “शंभू, आमच्या जिंदगीमध्ये दैवगतीनं, तकदीरानं सदभाग्याच्या

संदुकाच्या संदुका भरून आमच्या पायावर ओतल्या होत्या. पण आज खूप वाईट वाटतं ते एकाच गोष्टीसाठी .त्यातल्या चार दोन मुठी जर त्याच दैवगतीनं माझ्या शंभूबाळासाठी राखून ठेवल्या असत्या तर-"

संभाजी राजे : "आबासाहेब!"

शिवाजी राजे : "पोरा, कुठं, कुठं गेले ते तुझे गहिरे, तेजस्वी डोळे?"

संभाजी राजे : "आबासाहेब, केवळ वतनाच्या भुकेसाठी आपल्या भूमीतल्या अनेकांनी शेवटी दगाफटका केला. आज मृत्यूआधी नेत्र गेले ते एका अर्थी बरचं झालं! वतनाच्या स्वार्थासाठी चटावलेला हा मेलेला महाराष्ट बघण्यापेक्षा डोळे गेलेले काय वाईट?"

शिवाजी राजे : "खरं आहे पोरा! रयतेने तुला साथ दिली. तुझ्या हिंदवी स्वराज्याच्या झेंड्याखाली गोरगरीब जनता उभी राहिली, प्राणपणाने लढली, ज्यांनी अगरबत्तीसारखा देह जाळला. पण इथल्या वतनदारांनी, स्वार्थाने बरबटलेल्या जाणत्यांनीच तुझा घाट केला. अन्यथा सर्वांनी मिळून दगडफेक केली असती, तरी पातशाहा केव्हाच परलोकी झाला असता! पण स्वार्थासाठी राजा मारावा राज्य बुडावे आणि वतनं तेवढी टिकावीत, असचं वाटतं होतं त्यांना,

तुझ्यावर ओढवलेला हा दैवघात म्हणजे ह्या साऱ्याचाच परिपाक आहे!”

संभाजी राजे : “आपल्या शब्दांनी किती कोडी सोडवलीत, आबासाहेब!”

शिवाजी राजे : “बा महाराष्टा! साफल्यपूर्ण जीवन कसे जगावं हे ह्या शिवाजीन तुम्हांला शिकवलं असेल, पण देशधर्म आणि मातीसाठी मरावं कसं, याचा बोध रयतेनं आमच्या शंभूराजांपासून घ्यावा! हे महाराष्टा, ह्या शिवाजींच्या गौरवाच्या नादात, आमच्या शंभूराजांच्या बलिदानाकडे दुर्लक्ष करायचा प्रमाद करू नकोस. शंभू, आपल्या पराक्रमानं तू गाठलेला कळस पाहून एकच सांगावसं वाटतं. ज्या दिवशी तुझ्या पराक्रमाची गाथा जनांसमोर येईल, तेव्हा आपल्या पूर्वजांच्या वंशावाळीचा शोध घेण्यासाठी कोणी राजस्थानच्या वाळूकडे धावण्याचा मुर्खपणा करणार नाही. उलट बाहेरचेच महायोद्धे ह्या पोलादी सह्यापर्वतांशी आपले नाते संबंध जुळवतात का, याचा शोध घेण्यासाठी इकडे धाव घेतील.”

संभाजी राजे : “आबासाहेब, आपल्या शब्दांनी आम्ही पावण झालो. मृत्युच्या उंबरठ्यावर आज आमच्या काळजात

कोणतेही शल्य उरलेलं नाही. उलट मृत्यूला मिठी मारण्यासाठी आम्ही अधीर झालो आहोत. आबासाहेब, अधीर झालो आहोत. ह्या संभाजीच्या मृत्यूने मेलेला महारष्ट्र जागा होणार असेल, गवताला भाले फुटून आलमगीर पातशहाची कबर दक्षिणेतच गाडली जाणार असेल, तर आमचा मृत्यू देखील आम्हांला भाग्यादायीच वाटेल!" [पहाटेच्या शांत झोपेतून संभाजी जागे होतात शिवाजी राजे अंधारात निघुन जातात राज्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडले.] कविराज-?" [पण कवींना जीभ नव्हती फक्त त्यांची धडपड राज्यांच्या कानावर पडत होती. राजे पुढे बोलत असतात.] "मृत्यू असतो एक हट्टी पाहुणा. हाकलून दिला तरी देवडीवर ठाण मांडून बसणारा एक हट्टी मेहमान. आता त्यांनी केव्हाही यावं – बिजलीचा लोळ बनून, आणि राजप्रसादाचे खांब माथ्यावर कोसळावेत! कविराज आता या देहाला मृत्यूची तमा वा भीती राहिली नाही..!" "उरली होती तमन्ना फक्त एकाच गोष्टीची. त्या औरंग्याची मुडकी छाटून, ती चितदरवाजाच्या उंबरठ्याखाली एकदा गाडली असती आणि हसत हसत स्वर्गाच्या शिड्या चढून निर्धास्त मनानं

वर गेलो असतो! आज आम्हांला दु:ख होतं ते एकाच गोष्टीचं.

ज्या हातांनी दूर कावेरीच्या महापात्रांत घोडी घातली, त्रिचनापल्लीच्या गर्विष्ठ पाषणकोटाच्या तटबंध्याना सुरुंग लावले, नाठाळ सिद्धीच्या शेपट्या तोडून त्यांला जिंजीऱ्याच्या बिलातच वळवळत ठेवलं. मोकाट श्वान फक्त दुरूनच फिरून गुरगुरत जावेत, तशा औरंगजेबाच्या पाच लाख फौजेला सह्याद्रीच्या पर्वतराजीत ज्यानं घुसू दिलं नाही. एखाद्याही किल्याला हात लावण्याची मोगलांना हिंमत झाली नाही. त्याच शंभूच्या पाठीत आप्तस्वकीयांनी बगावतीची विखारी कट्यार घुसवावी! या शंभूनं जिंदगीभर मरणाला कधीच मोजलं नाही. मृत्यूच्या तटबंदीला आम्ही अनेक-वार ढूसण्या दिल्या. उलट मृत्युलाच आमची आणि आमच्या बहादूर मानसाजनावरांची इतकी धास्ती असायची की, तो अनेकदा आडोशाला पळून जायचा. [थाबून] पण... आज मृत्यू हा असा चोरासारखा घातकी पावलांनी, दबकतदबकत यावा, याचंच खूप दु:ख होतं.” [आक्रांत करत] “कविराज, चाललात आपण मृत्युच्या

महामंदिराकडे? आमच्या आधी? किती भाग्यवान आहात आपण?”

[कविराजांची तगमग राजांना ऐकू येते. आकाशवाणी झाल्यासारखा आवाज येतो.] { “होय राजन, आहेच मी भाग्यवान! म्हणून तर धावलो मी तुमच्या आधी त्या स्वर्गमंदिराकडे; ‘राजन, आपल्यासाठी देवाच्या दरवाजातल्या फुलांच्या परड्या लुटून आणतो आणि तुमच्या मार्गावर अंथरतो! इतक्या दिवसाच्या अतिश्रमाने आपली पावले भेगाळली असतील, थकली असतील. मिळो त्यांना तेवढाच दिलासा.”}

[तेवढ्यात औरंग्याचे सैनिकांनी यमदुतासारखं कवींना खेचून दूर नेलं. आणि कविराजचे हात,पाय तोडून भीमेच्या नदीपात्रात फेकून दिले.] [दुसऱ्या बाजूनी औरंगजेब प्रवेश करतो. कशाचा तरी आवाज येतो हे एकूण शंभूराजे सावध होतात ताट मान, छाती पुढे उभे राहता.]

औरंगजेब : “संभा, जहन्नमी तू तुझ्या बापापेक्ष दसपट आम्हांला परेशान केलस, सातवलस, आमची एकही गुजारिश कबूल केली नाहीस! तुझ्या तोंडून शरणागतीचे लब्ज

ऐकावेत, या एकाच इराद्यानं आम्ही तुझी जुबान शाबूत ठेवली होती. तिचाही तू इस्तेमाल केला नाहीस. आमच्याशी गद्दारी करणाऱ्यांची नाव सांगत नाहीस. तुझे डोळे काढून तुला अंधाराच्या दर्यात ढकलले तरी तुझ्या पायात भयकंप सुटत नाही! एवढ होऊनही रायगडावरच्या शिखरावर बसलेली तुझी राणी तुझ्या जिंदगीची भीक मागण्यासाठी आमच्याकडे येत नाही. सह्याद्रीच्या पहाडासारखी तुम्हा दोघांची किती ही बेगुमानी!" संभा, यापुढे तुला जिंदा ठेवावा, यासाठी वजह तरी काय उरली आहे?" [संभाजीराजे ताठ उभा राहून.]

संभाजी राजे : "पण, एक लक्षात ठेव; माझ्या प्रत्येक रक्ताच्या थेंबातून असंख्य संभाजी तयार होतील. माझ्या दोन हाताातू लाखो हात या सह्याद्रीच्या कडेकपारीतून तुझी लांडगे तोड करण्यासाठी एकत्र येतील अन तुझी जुलमी सत्ता उलथून त्याची राख रांगोळी करतील. अरे, सह्याद्रीचे छावे आम्ही मरणाची भिक मागणार नाही. गादीसाठी स्वताच्या रक्तचा घोट घेणारी औलाद नाही आमची! जन्म दात्याला कैदेत ठेऊन जुलूम करणे मराठ्याच्या रक्तात नाही. तुझी ही मोगली सत्ता

मराठेशाही लाथेच्या थोकऱ्याने उडवून दिल्या शिवाय राहणार नाही. तुझ्या सारख्या लांडग्याला महाराष्ट्रचे छावे पळताभुई थोडी केल्या शिवाय राहणार नाहीत. वाघाच्या जबड्यात घालूनी हात मोजती दात ही औकात आमची.”..

औरंगजेब : “खामोश!” काट डालो इसके हात, तोड डालो इसके पाव, काट डालो इसकी जबान ये जबान बहुत बोलती है. इसके जबानने जिंदा जाला दिया हमे!....देखते क्या हो!” काटकर फेक दो...ले जाव इसे हमारे सामने से जाव...

...[हशम राजांना घेऊन जातात. हाल हाल करतात.]

{ औरंगजेब डोक्याला हात लाऊन बसतो काहीच मिळालं नाही या वैषम्य अवस्थेत. संभाजीला इंद्रायणी आणि भीमा नदीच्या संगमावर मौजे तुळापुर येथे बांधले जाते. जीभ कापली जाते, हात – पाय तोडले जाते. सगळ्या यातना संभाजीराजे चाळीस दिवस सोसत असतात. दुसऱ्या बाजूने औरंगजेबाच्या दरबारात शिपाई येतो.}

*वरील अत्याचार होत असताना पडद्या मागून बोलणे*

[फंद फितुरीमुळे मराठ्याचा मुकुठ मोघलांच्या पायात पडला. अविरत ९ वर्षे १२ आघाडयाशी झुंज देणारा माझा सर्जा संभाजी राजा अखेर मोगलांच्या तावडीत सापडला. हालहाल केले मराठ्याच्या राजाचे किती किती सहन केले अत्याचार तब्बल ४० दिवस ... कुणासाठी सहन केलं हे सार, कशासाठी, मराठशाहीच्या दौलतीसाठी, हिंदीवी स्वराज्यासाठी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अस्मितेसाठी, राष्ट्रधर्मासाठी अखेर औरंगजेबाची शेवटची शिक्षाचे फर्मान आले कात दो गर्दन उसकी अन उजाडला तो कळ दिवस ती काळी रात्र फाल्गुनी वद्य आमावश्या ११ मार्च १६८९ मराठ्याचा राजा महाराष्ट्रच्या मातीसाठी बलिदान झाला]

**[पांढरा पडदा लाईट पडद्या मागे वरील सर्व दाखवणे.]**

औरंगजेब : “क्या बोला वो संभ्या!”

शिपाई : कुछ नही हुजूर !

औरंगजेब : क्या आयेगा वो हमारी माफी मांगने !

शिपाई : ना हुजूर !

औरंगजेब : तो क्या बोलता है वो काफर !

शिपाई : “हुजूर !!! संभाजी ना रोया, ना आयेगा माफी मांगने आपके पास !”

औरंगजेब : “तो जाओ ईश्रक करो उसका ! सचमुच छावा है छावा शेर का ! कैसा है ये शुरूर बच्चा ! हमने आंखे निकालदी इसकी , लेकीन इसकी आंखे झुंकी नही हमारे सामने, हमने जबान कांट दी इसकी लेकीन ऊस जबान से मांगे नही रहम के दो लब्ज ! हात तोड दिये उसके लेकीन हाथ फैले नही हमारे सामने, हमने पाव कांट दिये उसके, लेकीन नही घुंटने टेंके हमारे सामने, गर्दन कांट दि उसकी लेकीन उसकी गर्दन नही झुंकी हमारे सामने ! सचमुच छावा है छावा शेर का, या अल्लाह! होंगे कामयाब कभी क्या यैसेही लोटना पडेगा खाली हात देह्ल्ली!”....[पाय टेकून खाली बसतो डोळे बंद करून. तेवढ्यात दुसऱ्या बाजूनी शाहाबुद्धीन, रुहुल्लाखान, हसन अलीखान येतात..] “या अल्लाह रहम कर..... !”

शाहाबुद्धीन : “पातशहा सलामत...चलिये हजरत चलिये-.” [त्या हाकेने पातशहा दचकला. भानावर आला.] सारे सरदार एकत्र आले आहेत. त्यांना आपल्या धन्याची वाह! वाह! कराची आहे. [रुहुल्लाखान चेकाळून बोलाल.]

रुहुल्लाखान : “चलिये हजरत, तुम्हांला फतेह की मुबारक बात देण्यासाठी आपली सारी फौज तिकडे बेताब बनली

आहे. तेथेच नामचंद सरदार आपली वाट पाहत आहेत. नेक मराठे वतनदार, बम्मन जमीनदार, मराठे सरदार भी आये है. [पातशहा हसत बोलला.]

औरंगजेब : “क्या मिलना मराठोंके उन कुत्तोसे? वतनाच्या लालचेने आलेले कुत्ते –आपल्या राजाशी एकनिष्ठ, वफादार राहिले नाहीत ते आमच्याशी काय वफादारी निभावणार नालायक, हरामजादे हाकलून द्या; त्या लालची कुत्र्यांना, उनकी क्या हैसिय्त , क्या पर्वाह?

हसनली खान : “लेकिन, जहाँपन्हाँ.”

औरंगजेब : “फक्र मत किजिए, उन नादानोंकी. त्यांना आज हाकलून दिले तरी उद्या पैरोंमे पुंच्छ डालके फिर वापिस आ जायेंगे वो नामर्द! हमारे पास.”

इखलास खान : “लेकिन, जहाँपन्हाँ, फौजेचे एक जरुरी काम आहे आपणाकडे.”

[पातशहाच्या भुंड्या मस्तकाकडे पाहत बोलला.] “आपके सरपर कितने सालोंसे ताज नाही है.

औरंगजेब : [मान हलवत] “अं.”

हसनली खान : “जी हां, मेरे आका, चलिये आप... सालोसाल आपले भुंडे मस्तक बघताना आम्हां फौजींना स्वत:ची

लाज वाटायची. संभाचा खात्मा केल्याशिवाय डोक्यावर किमाँश न घालण्याची सौगंध आपण पाच लासामागेच घेतली होती. आपल्यासाठी खास कल्याणच्या सोनाराकडून करोडो किंमतीचा हिरेजडीत किमाँश आम्ही आणला आहे साहेबस्वारीसाठी!"

[एकदम सर्वजण] हां..हां..हुजूर! चालिए, पुरे शानशौकत के साथ पेश करायचा आहे."

औरंगजेब : [खिन्न स्वरात.] "इसकी क्या वजह है?

हसनली खान : "आपल्या जबरदस्त बहादूरबद्दल. आपण एका नादान दुश्मनाला जिंदा कत्ल केलात. [औरंगजेबाच्या दिलातील खर माणूस जागा झाला. त्याच्या डोळ्यातील दो अश्रू पांढऱ्याशुभ्र दाढीवर ओघळले. तो उदास आवाजात बोलला.]

औरंगजेब : "अरे बेवकूफ, कैसा जश्न मना रहे हो? मारणारा मेला आणि मेलेला अमर झाला! जिसने कत्ल किया वो मर गया और जिसका कत्ल हुआ वो तो अमर हो गया!!"

[शेवटी औरंगजेबालाही शंभूराजांनी अमर राहून घुटने टेकायला लावले पण स्वता: मरेपर्यंत घुटने टेकले नाही.]

{औरंगजेब नमाज पडत अल्लाहची माफी मागत घुटने टेकत.}

“या अल्लाह रहम कर..... !”

**** पडदा ****


## *!!जय शंभूराजे!!*

*अखेर १४ वर्षे लढत राहिला राजाशिवाय हा महाराष्ट्र औरंगजेबशी.. परत दिल्लीला जायचं भाग्य शेवटी औरंगजेबाच्या वाट्याला आलेच नाही. संभाजीच्या रक्ताच्या थेंबातून लाखो संभाजी, धनाजी, संताजी सारखे एकेक लढत राहिला १४ वर्षे अन इथचं औरंगजेबाची कबर बांधली अन मग, शांत झाला महाराष्ट्र, ही प्रेरणा होती संभाजी राजाच्या बलिदानाची, राजांच्या राष्ट्र प्रेमाची, राष्ट्र भक्तीची...*

*जय संभूराजे!*

**- समाप्त** –

**आग्र्याहून सुटका झाल्यावर शिवाजी महाराज राजगडावर पोहोचले. तेथून रांगणा गडाला घातलेला वेढा उठवण्यासाठी महाराज ११ एप्रिल १६६७ ला या भागात दाखल झाले. रांगण्याचा वेढा उठवून १३ मे १६६७ रोजी महाराज मनोहर गडावर गेले. तेथे त्यांनी १५ जून १६६७ पर्यंत म्हणजे तब्बल ३४ दिवस मुक्काम केला.**



# हे नाटक आपल्या गावी सादर व्हावे

अशी इच्छा असल्यास

किंवा

**आपल्याला  नाटक बसवण्याची इच्छा असल्यास**

संपर्क साधा-

**श्री. मनोज सखाराम शेडगे एम.ए.बीएड.**

पत्ता : २६७ / ३६ दुर्वांकुर जानकीनगर उंचगाव

कोल्हापूर ता: करवीर जि : कोल्हापूर

मूळ गाव : शिवापूर [कुडाळ जि : सिंधुदुर्ग]

८४२१०३८५११ / ७५८८१४४२३२

Email: svm.manojshedge@gmail.co.